**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २३/०७/२००९

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची** सभा क्र.२ मंगळवार दि.२८/०७/२००९ सकाळी ११.३० **वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील** मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात **खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.**

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- २**
**सन-२००९-२०१०**
**मंगळवार दिनांक - २८/०७/२००९ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| ३ | मा.स्थायी समिती सभा क्र.१५ सोमवार दि. २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ४ | अर्जदार श्री. अंबादास चव्हाण अध्यक्ष, अनाम प्रेम संस्था अहमदनगर यांचे अंध अपंगासाठी काम करणा-या अनाम प्रेम संस्थेला रक्कम रूपये दहा हजार फक्त चे आर्थिक अनुदान देणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यांत येणा-या स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी संचालक म्हणून प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दिनांक २० नोव्हेंबर २००८ पासून पुढील सहा महिन्यासाठी रूपये ८,०००/- चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ.श्री.सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २२/१०/२००८ ते दिनांक २१/१२/२००८ व दिनांक २३/१२/२००८ ते दिनांक २२/६/२००९ अखेर दरमहा रूपये १५००/- चे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस. |

| | |
|---|---|
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे दिनांक ३/१/२००९ ते २/७/२००९ अखेर सहा महिन्याकरिता डॉक्टरांचे पॅनलशिपवर भुलतज्ञांचे केलेल्या नेमणूकास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस. |
| ८ | अहमदनगर  शहर पर्यटन विकास अंतर्गत सीना नदी सुशोभिकरण करणे चे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचिवर विविध पदे निर्माण करणे बाबतचा प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत (IHSDP) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता कंन्सलटंट / आर्किटेक्ट नेमणुकीबाबतच्या तुलनात्मक तक्त्यास व सदर कामी आलेल्या / येणा-या खर्चास मान्यतेसाठी ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मार्केट विभाग मार्फत रस्ताच्या कडेला बसणारे भाजी विक्रेते, फळविक्रेते, चहा व पानाच्या टप-या, हातगाडीवाले व तत्सम विक्रेते यांच्याकडून रस्ता बाजु फि निविदा पध्दतीने वार्षिक ठेका वसुलीस देणे बाबत निविदा काढणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये विविध कंपन्यांकडून जमीन अंतर्गत टेलीफोन केबल (Optical Fibar Cabal) टाकणा-या संस्थांकडुन रॉयल्टी घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये बुरूडगांव  ते बुरुडगांव स.नं. ३४ पर्यत रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीत (सन-२००९-१०) टॅंकर्सद्वारे पाणी टंचाई क्षेत्रात पाणी वाटप करणे कामी, टॅंकर्स भाडे तत्वावर लावणे कामी निविदा मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर भागासाठी  पाणी पुरवठा योजना १५.०० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची उंच टाकी सरंक्षक भिंतीसह बांधणे बाबतचा तुलनात्मक तक्ता मंजूरीस्तव. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी टॅंकर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी सन-२००९-२०१० साठीचे वार्षिक मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथील महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट  मंजुरीसाठी. |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागात मिळकत व्यवस्थापन विभागासाठी मानधना वरील नेमलेल्या तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांना मुदतवाढ देणे बाबतचा   ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |
| १९ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन- २००८-२००९ चे  बाबवार जमा-खर्च वार्षिक लेखे, वार्षिक लेख्याचा गोषवारा व मत्ता दायित्वबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |

| | |
|---|---|
| २० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव, मोतीबागनगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व खर्चास मा. स्थायी समिती ठराव नं.८ दि.१५/१२/०८ अन्वये मंजूरी प्राप्त असुन,दरसूची मध्ये अनवधानाने झालेली चूक दुरुस्त करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीसाठी |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते दत्त मंदिर ते अचानक वस्ती जवळील पवार घरापर्यत १०० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील बोहरी चाळ येथे अंबिका निवास ते अंतरे घर ते चेन्नूर घर ते निकाळजे घरापर्यंत ८० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २३ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २९ रेणावीकर कॉलनी कुलकर्णी सखी अपार्ट मेंट, जाधव घर ते कोकणे घरापर्यत तसेच गृहशिल्प हौ.सो. व विद्या कॉलनी अंतर्गत रस्त्यावर २५ एमएम जाडीचे ओपन ग्रेडेड कारपेट व लिक्वीड सिलकोट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २४ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ११ मधील नागापुर गावठाण स्लम भागातील श्री. विष्णु पवार घर ते अशोक काळे घर ते भाकरे घरादरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते संभाजी कॉलनी येथील भोजने घर, धोत्रे घर ते नरसाळे घर व मातृश्री अपार्ट ते घोरपडे १५०,१००,८० व ५० एम एम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २६ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मध्ये दौंड रोड, इंदिरानगर येथील विहीरीजवळ आर.सी.सी. भिंत बांधणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २७ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ अचानक वस्ती येथील मधु कुडे घर ते सुद्रीक घर व साठे घर ते ताकवाले घर अंतर्गत भागात ३०० व २०० एमएम व्यासाची आर.सी.सी पाईप गटर करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ गुगळे कॉलनी येथील बिडवे घर ते औटी घरापर्यत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| २९ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर स्लम भागातील श्री. पाटोळे घर ते भाकरे घर ते गोरे, गायकवाड घर दरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| ३० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पाणी पुरवठा करणेकरीता कष्टकरी महिला संघ या संस्थेचा टॅक्टर टॅंकर भाडेकराराने व मागणी केलेल्या दराप्रमाणे चालू करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |

| | |
|---|---|
| ३१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेकामी समिती गठीत करणे किंवा इतर महानगरपालिकेतील बससेवेचा अभ्यासपुर्ण विचार करुन मा.स्थायी समिती कडुन मंजूर करुन बससेवा सुरु करावी किंवा कसे याबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव सादर. |
| ३२ | श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ, उद्यान बिगारी,यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) ग नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| ३३ | श्रीमती वैशाली नाथा जाधव, सफाई कामगार,यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| ३४ | श्री. बाबासाहेब अशोक घोरपडे, सफाई कामगार,यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ. |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी जरूरी प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे कामी जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३६ | यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधीनी पुणे या संस्थेतर्फे चालविण्यात येणा-या नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास उपायुक्त (कर) यांना पाठविणे व त्याकामी येणारे खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. |
| ३७ | अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता ड्रेनेज सफाई करणे कामी टाटा ११०२ चेसी व त्यावर पॉवर जेटींग मशीन करून घेणे कामी येणारे खर्चास व कामास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १५ सोमवार दि. २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत
व विषय-क्रमांक ३ ते ३७ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ सोमवार दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ सोमवार दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती चे मागिल सभा दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. व मा.श्री. पवार बा.रे. :- मागिल सभे मध्ये मंजूर झालेल्या ठरावांची माहिती सांगावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागिल सभेचे विषय वाचून दाखवावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २२/१२/२००८ रोजी चे सभेतील विषय वाचून दाखवावे.

त्या प्रमाणे मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ सोमवार दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे अजेंडया वरील विषय सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक २२,२३,२४,२५,२६ या कामाच्या दैंनिक गांवकरी मध्ये निविदा प्रसिध्दीची दिनांक दिलेली आहे परंतु त्या दिवशीच्या दै. गांवकरी मध्ये तशी प्रसिध्दी देणेत आलेला नाही. मागिल दिनांक १५/१२/२००८ व दिनांक २२/१२/२००८ या मा.स्थायी समितीच्या दोन सभा मागील जुन्या स्थायी समितीने घेउत्न अंदाजे आकरा कोटी रूपयांची डांबरीकरणाची कामे केलेली आहेत. सदरच्या कामाचे ठेकेदार हे ठराविक असल्याचे आढळते. त्यांनी कामे वाटून घेतली आहेत. महानगरपालिकेत रोख रकमाचा खडखडाट आहे कर्मचा-यांचे पगारला पैसा नाही. मागील सदस्यांनी चालू वर्षी साठी रूपये आकरा कोटी ची डांबरी करणाची कामे कशी मंजूर केली याची चौकशी होउत्न प्रोसिडींग बुकामध्ये हरकती बाबत नोंद घेण्यांत यावी विरोध नोंदवावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १५ सोमवार दिनांक २२/१२/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सदरचे ठराव मंजूरीस मा.स्थायी समिती सदस्य मा.श्रीमती ढोणे मालन सुरेश यांचा विरोध.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. अंबादास चव्हाण अध्यक्ष, अनाम प्रेम संस्था अहमदनगर यांचे अंध अपंगासाठी काम करणा-या अनामप्रेम संस्थेला रक्कम रूपये दहा हजार फक्त चे आर्थिक अनुदान देणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- टिप्पणी-विषय-अंध अपंगासाठी काम करणा-या अनामप्रेम संस्थेला आर्थिक सहयोग देणे बाबत.

सादर,

अर्जदार श्री. अंबादास चव्हाण अध्यक्ष, अनाम प्रेम संस्था, अहमदनगर यांनी अंध अपंगासाठी कार्य करणा-या संस्थेस भरीव अनुदान मिळणेस विनंती केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९६६ अन्वये महागनरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सदर कलमात नमुद केलेल्या बाबीसाठी किंवा कोणत्याही बाबीसाठी वेळोवेळी पुर्णत: किंवा अंशत: तरतुद करता येईल.

६६ (१) ज्या व्यक्ती अपंग किंवा आजारी आहेत किंवा ब-या होण्यासारख्या नाहीत अशा व्यक्तींची काळजी घेण्यासाठी किंवा आंधळे, बहिरे, मुके किंवा अन्यथा विकलांग व्यक्ती किंवा अधू बालके यांची काळजी घेण्यासाठी व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शहरात किंवा शहराबाहेर संस्था स्थापन करणे, चालवणे किंवा तिची व्यवस्था ठेवणे.

६६ (२५) शहरातील लोकांच्या दु:ख निवारणासाठी किंवा सार्वजनिक कल्याणासाठी उभारलेल्या कोणत्याही सार्वजनिक निधीस अंशदान देणे.

अहमदनगर महानगरपालिकेने सन-२००८-२००९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये "देणगी" या लेखाशिर्षकावर एकुण रक्कम रू. ५ लाखाची तरतुद केलेली आहे. सदर हेडवर आजपावेतो एकुण रक्कम रू. २,२५,०००/- एवढा खर्च झालेला आहे. अधिनियमातील कलम ६६ अन्वये अशा प्रकारे एखाद्या सार्वजनिक संस्थेस आर्थिक सहयोग देणे ही बाब ऐच्छिक कर्तव्यामध्ये समाविष्ट होत असुन सदरची बाब ही धोरणात्मक आहे. सदर संस्थेस रक्कम रू. १०,०००/- आर्थिक सहाय्य देणेबाबत प्रस्तावीत असुन सदरची बाब ऐच्छिक स्वरूपाची असल्याने सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेस विनंती आहे.

येणे प्रमाणे श्री.आर.ए.देशमुख, सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे. दि.९/०१/०९
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. अंबादास चव्हाण अध्यक्ष, अनाम प्रेम संस्था अहमदनगर यांचे अंध अपंगासाठी काम करणा-या अनामप्रेम संस्थेला रक्कम रूपये दहा हजार फक्त चे आर्थिक अनुदान देणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावा विषयी माहिती सांगावी.

मा. सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- अंध अपंगासाठी काम करणा-या अनाम प्रेम संस्थेचे अध्यक्ष श्री. अंबादास चव्हाण यांनी संस्थेस भरीव आर्थिक अनुदान मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. एखद्या संस्थेस आर्थिक सहयोग देणे ही बाब म.न.पा. अधिनियम मध्ये ऐच्छिक कर्तव्यामध्ये समाविष्ठ होत असून सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने मा.स्थायी समिती सभेपुढे प्रस्ताव मंजूरी साठी सादर केलेला आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्टानुसार सदर संस्थेस रक्कम रूपये दहा हजाराचे अनुदान देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- अनुदान मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- अंध अपंगासाठी काम करणा-या अनाम प्रेम संस्थेस रक्कम रूपये दहा हजाराचे अनुदान देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री. अंबादास चव्हाण, अध्यक्ष अनाम प्रेम संस्था, अहमदनगर यांचे अंध अपंगासाठी काम करणा-या " अनाम प्रेम" संस्थेस रक्कम रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार फक्त) चे आर्थिक अनुदान देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सही /-

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यांत येणा-या स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी संचालक म्हणून प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दिनांक २० नोव्हेंबर २००८ पासून पुढील सहामहिन्यासाठी रूपये ८,०००/- चे मानधनावर नेमणूक करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी मानधनावर प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची संचालक म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत.

प्रसिध्दी अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३/३ नुसार स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्र व्यवस्थित चालू राहाण्याच्या दुष्टीने श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणुन दि. २० नोव्हेंबर २००८ पासून पुढील सहा महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रूपये ८,०००/- मानधनावर नेमणुकी बाबत अखेर मंजूरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावा विषयी माहिती सांगावी.

प्रसिध्दी अधिकारी सौ. बंडेलू मॅडम :- अहमदनगर महानगरपालिकेने दोन वर्षापुर्वी स्पर्धा परिक्षा केंद्र सुरू केलेले असून त्यामध्ये प्रवेश देणेसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन्न विद्यार्थाचे अर्ज मागविण्यांत येतात. त्यांची परिक्षा घेउन्न गुणानुक्रमानुसार परिक्षार्थीना प्रशिक्षण वर्गासाठी प्रवेश दिला जातो. परिक्षार्थीना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे एम.पी.एस.सी. पी एस आय विक्रीवर अधिकारी MPSC इत्यादी परिक्षा साठी मार्गदर्शन केले जाते. तेथे विद्यार्थीना अभ्यास करता येतो. सदरचे स्पर्धा परिक्षा केंद्रा साठी संचालक म्हणून प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची मानधनावर नेमणूक केलेली आहे. त्यांची मुदत संपलेने दिनांक २० नोव्हेंबर २००८ पासून पुढील सहा महिन्यासाठी दरमहा रूपये ८,०००/- या प्रमाणे मानधनावर त्यांची नेमणूक करणेस अखेर मंजूरी मिळणे करितां प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- श्री. मिसाळ सरांनी म.न.पा.चे स्पर्धा परिक्षा केंद्र चांगल्या प्रकारे चालविले असून त्याचा अनेक विद्यार्थ्यानी लाभ घेतला आहे. त्या बध्दल त्यांचे अभिनंदन करावे.

मा.सभापती साहेब :- त्यांचे अभिनंदनाचा ठराव करणेत यावा.

मा.श्रीमती ढोणे मा.सु. :- त्यांचे मानधन रक्कमे मध्ये वाढ करावी.

प्रसिध्दी अधिकारी सौ. बंडेलू मॅडम :- त्या पूर्वी मानधन रूपये सहा हजार होते ते वाढवून आठ हजार केलेले आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रशासनाने सहा महिन्यासाठी केलेल्या नेमणूकीस अखेर मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे. त्यांचे मानधन वाढविणे विषयी चा प्रस्ताव सभे पुढे सादर केल्या नंतर मा. सदस्यांनी त्या विषयी चर्चा करावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यांत येणा-या स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी संचालक म्हणून प्रा. श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दिनांक २० नोव्हेंबर २००८ पासून पुढील सहा महिन्यासाठी रूपये ८,०००/-(रूपये आठ हजार फक्त) चे दरमहा मानधनावर नेमणूक करणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांनी चांगल्या प्रकारे संचालीत केले असुन त्याचा फायदा अनेक विद्यार्थांनी घेतलेला असुन सध्याही घेत आहेत. त्यामुळे महानगरपालिकाचे लौकीकात भर पडलेली आहे. त्या बध्दल त्यांचे अभिनंदन.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून दिनांक २२/१०/२००८ ते दिनांक २१/१२/२००८ व दिनांक २३/१२/२००८ ते दिनांक २२/६/२००९ अखरे सहा महिन्यांकरिता रूपये १,५००/- चे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- तात्पुरत्या स्वरूपात मानधानवर बालरोग तज्ञ यांचे नेमणुकी बाबत.

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी असते. आस्थापना कायम सुचीवर बालरोग तज्ञ पद मंजूर नाही.त्यामुळे आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञ म्हणुन मानधनावर नेमणूक करावी लागते मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी १. डॉ.श्री. सुभाष फिरोदिया २. डॉ. अनिरूध्द गिते ३. डॉ. सुचित तांबोळी यांची ऑनरी बालरोग तज्ञ म्हणून नेमणूकी बाबत प्रस्ताव सादर केलेला असुन सदर बालरोग तज्ञ यांची मुदत समाप्त झालेली असल्यामुळे दिनांक २३/१२/०८ ते २२/६/०९ अखेर नेमणूक करणे आवश्यक आहे.

सध्या मा.स्थायी समिती ची बैठक होणे शक्य नसल्याने दिनांक २३/१२/२००८ ते २२/६/२००९ अखेर सदर बालरोग तज्ञ तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रूपये १,५००/- वर सहा महिन्याकरिता एकत्रित मुशाहि-यावर नेमणूक करण्यांत आलेली आहे.सदर नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये सदर प्रस्ताव मंजुरीस्तव मा. स्थायी समिती समोर ठेवणेस सादर.

--**--

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा .दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यक्ता नेहमी असते. आस्थापना सुचिवर बालरोग तज्ञाचे पद मंजूर नसल्यामुळे १. डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, २. डॉ.श्री. अनिरूध्द गिते, ३.डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची ऑनररी बालरोग तज्ञ म्हणुन मानधनावर नेमणूक करावी लागते. यापुर्वी बालरोग तज्ञ यांची मानधनावर नेमणुकी बाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला असता दरम्यानच्या काळात आचारसंहितेमध्ये मा.स्थायी समितीची बैठक होणे शक्य नसल्याने अत्यावश्यक सेवेमध्ये वैद्यकीय सेवेशी निगडित असल्याने दि. २२-१०-२००८ ते २१-१२-२००८अखेर २ महिन्या करिता रू.१,५००/-मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. सदरच्या नेमणुकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे आवश्यक आहे. सदर कालावधीतील नेमणुकीची मुदत समाप्त झालेली आहे. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या प्रस्तावाप्रमाणे बालरोग तज्ञ यांची मुदत समाप्त झालेली असल्यामुळे दि.२३-१२-२००८ ते २२-६-२००९ अखरे ६ महिन्या करिता दरमहा रू.१,५००/- च्या मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणुका बाबतचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५४अन्वये मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव ठेवणेस सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये बालरोग तज्ञांची नेमणूक करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सर्व खाते प्रमुखांना सुचना देणेत येते की ज्या विभागाचा विषय असेल त्यानी सभागृहास प्रस्तावाची माहिती स्वताः सांगावी.

मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. श्री. टेकवाणी :- महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृहात पांच ते सहा हजार प्रसुती होतात.अडचणीची परिस्थीती उद्‌भवती तर त्यावेळी या बालरोग तज्ञाना पाचारण केले जाते. मनपाचे आस्थापना कायम सुचीवर बालरोग तज्ञांचे पद मंजूर नसलेने पूर्वी पासून बालरोग तज्ञांची मानधनावर नेमणूक केली जाते. त्यामध्ये डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी हे तीन डॉक्टर मागिल दहा वर्षापासून मानधनावर आपली सेवा पुरवितात.

मा.सभापती साहेब :- बी.डी.सी.डी. दवाखान्या बध्दल माझ्याकडेस काही तक्रारी आलेल्या आहेत. तेथे प्रसुती साठी आलेल्या महिलांना डॉक्टर घाबरवतात व आपल्या खाजगी दवाखान्यामध्ये पेशंटला ॲडमीट होणस भाग पाडतात त्यांचेकडून जास्त फी वसुल करतात अशा तक्रारी आहेत हे डॉक्टर कधी पासून महानगरपालिकामध्ये मानधनावर आले आहेत.

मुख्य वैद्यकीय अधिकारी श्री. टेकवाणी :- तशी तक्रार आमचे कडेस आलेली नाही. बालरोग तज्ञ म्हणून हे डॉक्टर दहा वर्षापासून महानगरपालिकामध्ये मानधनावर आहेत.

मा.श्री. भोसले ग.पु. :- अशी तक्रार आलेली आहे का?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- अशी तक्रार आल्यास त्याची दखल घ्यावी आपल्या हॉस्पीटल मध्ये ते येउन्र डयुटी करतात त्याना फक्त रूपये १,५००/- दरमहा मानधन देण्यात येते.

मा.श्रीमती गंभीर इं.कि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.पवार बा.रे.- :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ म्हणून डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची दिनांक २२/१०/२००८ ते दिनांक २१/१२/२००८ व दिनांक २३/१२/२००८ ते दिनांक २२/६/२००९ अखेर दरमहा रूपये १,५००/-(रूपये एक हजार पांचशे फक्त)चे मानधनावर नेमणूक करणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्रीमती. गंभीर इंदरकौर किशन. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे दिनांक ३/१/२००९ ते २/७/२००९ अखेर सहा महिन्याकरिता डॉक्टरांचे पॅनलशिपवर भुलतज्ञांचे केलेल्या नेमणूकास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रेषक-आस्थापना प्रमुख, प्रती-नगरसचिव , आस्था. जा.क्र. १२६ दि.१७/२/०९

प्रस्तावना-विषय- कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे पॅनलशिपवर वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) यांचे नेमणूकी बाबत.

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ पॅनलशिपवर वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) यांचे नेमणूकीबाबत मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

सध्या मा.स्थायी समितीची बैठक होणे शक्य नसल्याने मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे दिनांक ३-१-२००९ ते २-७-२००९ अखेर सहा महिन्याकरिता भुलतज्ञ (बधिरीकरण) यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. सदर नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये सदर प्रस्ताव मंजूरीस्तव मा. स्थायी समिती समोर ठेवणेस सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- भुलतज्ञांच्या नेमणूका करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्रीमती गंभीर इं.कि. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे दिनांक ३/१/२००९ ते २/७/२००९ अखेर सहा महिन्याकरिता डॉक्टरांचे पॅनलशिपवर भुलतज्ञांचे केलेल्या नेमणूकास अखेर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्रीमती गंभीर इंदरकौर किशन.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहर पर्यटन विकास अंतर्गत सीना नदी सुशोभिकरण करणे चे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :-प्रस्तावना-विषय- अहमदनगर शहर पर्यटन विकास अंतर्गत सीना नदी सुशोभिकरण करणे बाबत.

संदर्भ- मा. जिल्हाधिकारी कार्यालय क्र. जिनिसा/नपा/०८-०९/सांस-२/१४९ दि. ३०/१/०९

उपरोक्त विषय व संदर्भानुसार पर्यटन विकास योजने अंतर्गत अहमदनगर शहरातील सीना नदी पात्राचे सुशोभिकरण करणे कामी मा. जिल्हाधिकारी यांच्या दालनात दि.१६/१२/०८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेले आदेशानुसार सिनानदी सुशोभिकरण बाबतचा रक्कम रू. २९४.९५ लक्ष रूपयाचा प्रारूप प्रकल्प अहवाल जा.क्र. १६४५ दि. २४/१२/०८ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला.

मा.जिल्हाधिकारी यांचे कडील पत्र क्र. जिनिस/नपा/०८-०९/सांस-२/१४९दि.३०/१/०९अन्वये शहरातील सिना नदी सुशोभिकरणासाठी रू.१००.०० लक्ष इतका निधी राखीव ठेवला आहे. या योजनेचा रू.३००.००लक्ष किंमतीचा ढोबळ आराखडा आपण या कार्यालयाला सादर केला आहे. आराखडयातील जास्तीत जास्त कामे घेण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या स्वनिधीतून देखील रू.२५.००लक्ष ते ५०.०० लक्ष निधीची कामे प्रस्तावित करावीत. आपली प्रस्तावीत कामे आणि १००.०० लक्ष निधीतील कामांची सविस्तर अंदाजपत्रके तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यतेसह निधी वितरण करणे कामी या कार्यालयास सादर करावीत असे सुचित केले आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या पॅनल वरील आर्किटेक्ट श्री. मनोज जाधव यांचेकडून रक्कम १ कोटी २५ लक्षचे अंदजपत्रक व नकाशे तयार करून घेतले आहे. तसेच सदर प्रस्ताव प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम १ कोटी २५ लक्षचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणे साठी प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर.

सोबत:- कामाचे अंदाजपत्रक व आराखडे

येणे प्रमाणे उपशहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची विषयी माहिती सांगावी.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- विषय समजावून सांगावा

शहर अभियंता श्री. मगर :- अहमदनगर शहर पर्यटन विकास योजने अंतर्गत अहमदनगर शहरातील सिना नदी पात्राचे सुशोभिकरण करणे कामी मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे दालनात दि.१६/१२/०८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेले आदेशानुसार सिना नदी सुशोभिकरण बाबतचा रूपये २९४.९५ लक्ष रूपयांचा प्रारूप प्रकल्प अहवाल जा.क्र. १६४५ दि.२४/१२/०८

रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालया कडेस सादर करण्यांत आला आहे. या योजनेचा रू.३००.०० लक्ष किंमतीचा ढोबळ आराखडा आपण सादर केला आहे. आराखडयातील जास्तीत जास्त कामे घेण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या स्वनिधीतून देखील रू. २५.००लक्ष ते ५०.०० लक्ष निधीची कामे प्रस्तावित करावीत. आपली प्रस्तावीत कामे आणि १००.००लक्ष निधीतील कामांची सविस्तर अंदाजपत्रके तांत्रिक मान्यता आणि प्रशासकीय मान्यतेसह निधी वितरण करणे कामी या कार्यालयास सादर करावीत असे सुचित केले आहे.त्यानुसार महानगर पालिकेच्या पॅनल वरील आर्किटेक्ट श्री. मनोज जाधव यांचेकडून रक्कम १ कोटी २५ लक्षचे अंदजपत्रक व नकाशे तयार करून घेतले आहे. तसेच सदर प्रस्ताव प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम १ कोटी २५ लाखाचे प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. रूपये १ कोटी २५ लाख निधी प्राप्त झालेला आहे. म.न.पा.चा हिस्सा २५ लाख धरून रूपये एक कोटी पन्नास लाखाचे कामे करणे आहेत.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- सदर कामी सीना नदीची पुररेषा निश्चित केलेली आहे का ?

शहर अभियंता श्री.मगर एन.बी.:-पुररेषा निश्चित करून अतिक्रमण काढून हे काम करण्यांत येणार आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- नदीचे पूर्वे कडेस काम करणार का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- या प्रस्तावाचे प्लॅनिग कोणी केले आहे

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- आर्किटेक्ट श्री. मनोज जाधव यांनी केलेले आहे.

मा.सभापती साहेब :- योजनेचे ड्राईंग सभेस दाखवावे.

त्याप्रमाणे योजनेचे नकाशे इत्यादी सभेस दाखविण्यांत आले.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- अहमदनगर शहर पर्यटन विकास योजने अंतर्गत नदी सुशोभिकरण करावयाचे कामासाठी रूपये १ कोटी पंचवीस लाख निधी प्राप्त झालेला आहे. मनपाचा हिस्सा रूपये पंचवीस लाख धरून एकूण रू. १ कोटी पन्नास लाखाचे कामास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- नदी सुशोभिकरणास,प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री.पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. रक्कम रूपये १ कोटी पन्नास लाखाचे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मंजूर करावा. रूपये दीड कोटीचे खर्चास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- रक्कम रूपये १ कोटी पन्नास लाखाचे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी.

ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर शहर पर्यटन विकास अंतर्गत सीना नदी सुशोभिकरण करणे चे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,५०,००,०००/- (रूपये एक कोटी पन्नास लाख फक्त) मा.शासनाचा निधी रूपये १,२५,००,०००/- व म.न.पा. हिरसा रूपये २५,००,०००/- या प्रमाणे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक -९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवर विविध पदे निर्माण करणे बाबतचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय :- आस्थापना कायम सुचीवर पदे निर्माण करणे बाबत.

अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर होवुन जवळपास ५ वर्ष झालेली आहेत. शहराचा ८८ चौ.मी. इतका मोठा क्षेत्रफळाचा विस्तार असुन त्यामध्ये एकुण ६५ प्रभाग असुन सदर प्रभागातील दैनंदिन कामे,रस्ते,पाणी पुरवठा वितरण व इतर आवश्यक त्या सुविधा पुरविणे करिता आस्थापना कायम कर्मचारी /अधिकारी यांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे आस्थापना कायम सुचीवर कनिष्ठ अभियंता,प्रभाग अधिकारी,सहाय्यक आयुक्त व इतर आवश्यक पदे तात्काळ मंजुर होणे आवश्यक आहे.

तरी सदर मुळ प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार आस्थापना कायम सुचीवर तात्काळ पदे निर्माण करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरी घेवुन महानगरपालिकेच्या मा.महासभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- संपूर्ण प्रस्तावाची टिप्पणी मा. सदस्यांना दिलेली आहे का ?

नगरसचिव श्री. हब्बु एस.ए. :- आस्थापना विभागाकडून आलेली टिप्पणी मा. सदस्यांना पाठविण्यांत आलेली आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

आस्थापना प्रमुख श्री. साबळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवितो.

सादर,विषय :- आस्थापना कायम सुचीवर पदे निर्माण करणे बाबत.

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर होवुन जवळपास ५ वर्ष पुर्ण झालेली आहेत.अहमदनगर शहराचा ८८ चौ.मी. इतका मोठा क्षेत्रफळाचा विस्तार असुन त्यामध्ये एकुण ६५ प्रभाग आहेत.अहमदनगर महानगरपालिकेमध्ये बहुतांशी यापुर्वी केडगांव,सावेडी उपविभाग,नागापुर,बुरूडगांव, फकिरवाडा व बोल्हेगांव इत्यादी भागांचा समावेश झालेला आहे. सदरचा भाग मोठया प्रमाणात क्षेत्रफळाने विस्तारीत आहे. त्या ठिकाणी नव्याने दैनंदिन विकासकामे करतांना आवश्यकते प्रमाणे पद संख्या वर्गाचा आवश्कता भासत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत बुरूडगांव, झेंडीगेट, शहर विभाग व सावेडी विभाग असे चार प्रभाग समिती स्थापन करण्यांत आलेल्या आहेत. सदर समिती मार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे सुचित आहे. त्यानुसार सदर प्रभागाकरिता अंमलबजावणी करणेसाठी प्रभाग अधिकारीची आवश्यकता आहे. सदर चार प्रभागकरिता ४ प्रभाग अधिकारी आस्थापना कायम सुचीवर पदसंख्या मंजुर करणे आवश्यक आहे. सदर प्रभाग अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारी पाहता त्यांचे पदनामनुसार वेतनश्रेणी रूपये ६५००-१०५०० अशी असणे उचित वाटते.

अहमदनगर शहरातील मोठया क्षेत्रफळाचा विस्तार पाहता मालमत्ता कर वसुलीकरिता सहाय्यक आयुक्त (कर) पदाची आवश्यकता आहे. त्याकरिता सहाय्यक आयुक्त (कर) एक पद मंजुर होणे आवश्यक वाटते.

त्याचप्रमाणे आरोग्य विभागामार्फत शहरातील घनकचरा व्यवस्थापना बाबत कच-याची विल्हेवाट लावणे बाबत मा. न्यायालयाने सक्त निर्देश दिलेले असुन त्याचप्रमाणे घनकचरा विल्हेवाट अंमलबजावणी व नियत्रंण ठेवणे करिता सदर आरोग्य विभागासाठी सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) असे पदनाम मंजुर होणे आवश्यक आहे.

सहाय्यक आयुक्त (कर) व सहाय्यक आयुक्त (स्वच्छता) असे पदनाम मंजुर केल्यास आस्थापना कायम सुचीवरील प्रशासन अधिकारी व उप आरोग्याधिकारी असे पदनाम व्यपगत करणे योग्य वाटते. त्यामुळे आस्थापना वेतनावरील खर्चाच्या टक्केवारी कमी होण्यास मदत होईल.

त्याच प्रमाणे सध्या कायम आस्थापना सुचीवर बांधकाम विभागाकरिता खालीलप्रमाणे अभियंते कार्यरत आहेत.

| अ.नं. | अभियंत्याचे नांव | पदनाम | मंजुर वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | श्री. एन.बी. मगर | सिव्हील इंजिनियर | ८०००-१३५०० |
| २ | **रिक्त** | सिव्हील इंजिनियर | ८०००-१३५०० |
| ३ | श्री.आर.जी. सातपुते | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ४ | श्री. एम.डी. काकडे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ५ | श्री. व्ही.जी. सोनटक्के | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ६ | श्री. आर.जी. मेहत्रे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ७ | श्री. के. वाय. बल्लाळ | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ८ | श्री. बी. एम. अनाप | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ९ | श्री. एन.एल. नामदे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १० | श्रीमती एस.बी. बेलकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| ११ | श्री. एस.आर. निबांळकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १२ | श्री. एम.एस. पारखे | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |
| १३ | श्री. जी.के. गाडळकर | कनिष्ठ अभियंता | ६५००-१०५०० |

अहमदनगर शहराला अंदाजे ३१ ते ३२ किलो मीटर इतक्या लांबुन मुळानगर येथुन पाणी पुरवठा विळद घाट येथे  जल शुध्दीकरण केंद्र येथे आणण्यांत येवुन तद्नंतर शहरातील विविध भाग व उपनगरातील विविध टाक्यामध्ये पाणी साठवणुक करून पाणी वितरण केले जाते. सदर पाणी पुरवठा विभागाकरिता फक्त एकच मेकॅनिकल इंजिनियर श्री. पी.जे. निकम कार्यरत आहेत.

संपुर्ण केडगांव पाणी पुरवठा योजना कार्यन्वीत करणे करिता व शहरातील पाणी वितरण मधील त्रुटी दुर करणे करिता तसेच अतिक्रमण विभागाकरिता कर्मचारी स्टॉफ (तांत्रिक) अपुरा पडत असल्यामुळे खालीलप्रमाणे नवीन पदे स्वतंत्र निर्माण केल्यास शहरातील व उपनगरामधील पाणी पुरवठा वितरणामध्ये सुधारणा होईल तसेच अतिक्रमण निर्मुलन होण्यांस मदत होईल.

| अ.नं. | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त (महसुल) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २ | सहाय्यक आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन ) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेच्या पदवीधर |
| ३ | प्रभाग अधिकारी | ४ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| ४ | उप अभियंता (प्रभाग) | ४ | ८०००-१३५०० | बी ई सिव्हील, ३ वर्ष अनुभव, पदवीधारक असल्यास अनुभव १० वर्ष |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १३ | ५५००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |
| ६ | कनिष्ठ अभियंता (पाणी पुरवठा) | ७ | ५०००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |
| ७ | कनिष्ठ अभियंता (विदयुत) | ४ | ५०००-९००० (पदवी) ५०००-८००० (पदविका) | बी ई असल्यास ३ वर्ष अनुभव ( ५५००-९०००) पदवी धारक असल्यास १० वर्षाचा अनुभव (५०००-८०००) |
| **मुळा धरण ते विळद पाणी पुरवठा योजना** | | | | |
| ८ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| ९ | शिफ्ट इंजिनियर (मेकॅनिकल) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १० | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| ११ | शिफ्ट इंजिनियर (रजा राखीव) स्थापत्य | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १२ | पंपचालक | ४ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **विळद जल शुध्दीकरण** | | |
| १३ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १४ | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १५ | शिफ्ट इंजिनियर ( यांत्रिकी) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविका धारक |
| १६ | शिफ्ट इंजिनियर (रजा राखीव) स्थापत्य | १ | ५०००-८००० | डी. एम. ई. , डी. ई. ई. |
| १७ | पंपचालक | ७ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |
| १८ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | १ | ४५००-७००० | बी एस सी रसायन शास्त्र |
| १९ | गाळणी निरिक्षक | २ | ४०००-६००० | १२ वी सायन्स उत्तीर्ण |
| २० | गाळणी परिचर | ८ | २६१०-४००० | एस.एस.सी. उत्तीर्ण |
| | | **वसंत टेकडी** | | |
| २१ | शिफ्ट इंजिनियर (स्थापत्य) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २२ | शिफ्ट इंजिनियर ( यांत्रिकी) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २३ | शिफ्ट इंजिनियर (विद्युत) | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २४ | पंपचालक | ४ | ३०५०-४५९० | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रीशियन मेकॅनिकल ट्रेड उत्तीर्ण |
| | | **अतिक्रमण विभाग** | | |
| २५ | सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण) | १ | ६५००-१०५०० | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| २६ | स्थापत्य अभियंता | १ | ५०००-८००० | शासकीय तंत्रनिकेतन अगर शासन मान्य पदविकाधारक डीसीई |
| २७ | सर्व्हेअर | २ | ३०५०-४५९० | |
| २८ | अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य) | २ | ३०५०-४५९० | शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील स्थापत्य अभियांत्रिका स्थापत्य उत्तीर्ण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **विद्युत विभाग** | | | | |
| २९ | विद्युत उप अभियंता | १ | ८०००-१३५०० | बी ई (इलेक्ट्रीक) |
| ३० | शाखा अभियंता | १ | ६५००-१०५०० | डी ई ई, किमान १० वर्षाचा अनुभव |
| **वाहन विभाग** | | | | |
| ३१ | उप अभियंता | १ | ८०००-१३५०० | बी ई , मेकॅनिकल |
| ३२ | कनिष्ठ अभियंता | १ | ५०००-८००० | डी ई ई / डी एम ई |

सध्या आस्थापना सुचीवर खालीलप्रमाणे पदे मंजुर असुन आवश्यक जादा पदे मंजुर करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | पदाचे नांव | नवीन आवश्यक पदे | सध्या मंजुर पद संख्या | आवश्यक जादा पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आयुक्त | ३ | --- | ३ |
| २ | उप अभियंता | ६ | --- | ६ |
| ३ | कनिष्ठ अभियंता | ३८ | १४ | २४ |
| ४ | प्रभाग अधिकारी | ४ | --- | ४ |
| ५ | पंपचालक | ११ | १२ | --- |
| ६ | प्रयोग शाळा तंत्रज्ञ | १ | --- | १ |
| ७ | गाळणी निरिक्षक | २ | २ | --- |
| ८ | गाळणी परिचर | ८ | ८ | --- |
| ९ | सर्व्हेअर | २ | --- | २ |
| १० | अभियांत्रिका सहाय्यक (स्थापत्य) | २ | --- | २ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुली ठेका पध्दतीने होणार असल्याने त्यापासून महानगरपालिकेचे चांगल्या प्रकारे जादा अपेक्षित उत्पन्न होणार आहे. आस्थापना खर्चावरील टक्केवारी ४६.४०% इतकी आहे. परंतु मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली प्रभावीपणे करणेत येत असुन त्यामुळे उत्पन्नाचे स्त्रोत वाढवुन आस्थापना खर्च कमी करण्यासाठी जाणीव पुर्वक प्रयत्न होत आहे. त्यांचे चांगले भविष्यात परिणाम दिसुन येणार आहेत. त्याचप्रमाणे इतर ही बाबतीत अदा. दुरध्वनी, इंधन खर्च, वाहन खर्च, स्टेशनरी, वीज बचत इत्यादी खर्चात ही काटकसर करणेत येत आहे. त्यामुळे आस्थापना वरील सध्याचे खर्चाची टक्केवारी निश्चितच कमी होण्यास मदत होणार आहे.

आस्थापना कायम सुचीवरील आवश्यक पदे मंजुर नसल्याने दैनंदिन विकास कामावर विपरित परिणाम होवुन उत्पन्न वाढविणेमध्ये अडचणी निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा सारख्या अत्यावश्यक सेवेच्या वितरणामध्ये त्रुटी निर्माण होवुन नागरिकांमध्ये मनपाच्या सेवेबाबत असंतोष निर्माण होत आहे.

त्याकरिता वरील प्रमाणे आस्थापना कायम सुचीवर तात्काळ पदे निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी मासिक अंदाजे रूपये ५,९०,७६०/- जादा खर्च वाढणार आहे. सध्याचा खर्च ४६.४६ %असुन त्यामध्ये ०.९६ % ने वाढ होवुन ४७.३६% होईल.

सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ नुसार मा.स्थायी समिति व मा. महासभेची मंजुरीने मा. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मंजुरीस्तव पाठविणे आवश्यक आहे.

तरी सदरचे पदे कायम आस्थापना सुचीवर तात्काळ निर्माण करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीची मंजुरी होवुन मा. महानगरपालिकेच्या महासभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

अनावश्यक व व्यपगत करावयाचे पदाचा तक्ता.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अनावश्यक व व्यपगत करावयाची पदाची माहिती.

| अ.नं. | पदाने नांव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रशासनाधिकारी | ७४५०-११५०० | १ |
| २ | हेडक्लार्क | ६५००-१०५०० | १ |
| ३ | अकौंट चेकर | ५५००-९००० | १ |
| ४ | असि. शॅाप इन्स्पेक्टर | ५५००-९००० | १ |
| ५ | असि.टु. हेडक्लार्क | ५५००-९००० | १ |
| ६ | शिरस्तेदार | ५०००-८००० | १ |
| ७ | असि. ओव्हरसिअर | ५०००-८००० | १ |
| ८ | रोड बिल्डींग मिस्त्री | ४०००-६००० | २ |
| ९ | तालिम मास्तर | ३०५०-४५९० | २ |
| १० | कॅशियर बुकबॅंक | ५५००-९००० | १ |
| ११ | केमिकल क्लार्क | ४०००-६००० | १ |

येणे प्रमाणे कार्यालयीन अहवाल असे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- आम्हाला दिलेल्या अजेंडया बरोबर आस्थापना कायम सुचीवर पदे निर्माण करणे बाबत या विषयाचा तक्ता वैगरे सविस्तर प्रस्ताव मिळालेला नाही. तो सर्व स्थायी समिति सदस्यांना देणे आवश्यक आहे.मा. सर्वोच्च न्यायालायाचे निर्देशाप्रमाणे व मा. राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार घन कचरा व्यवस्थापन बाबत पद निर्मिती करणे. (१) प्रशासनाणे स्थायी समिति कडे पद निर्मिती बाबत प्रस्ताव सादर करताना घन कचरा व्यवस्थापन प्रमुख पदाबाबत काहीही उल्लेख नाही . सदर विभागाचे प्रमुख पदी मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पर्यावरण अभियंता / पब्लिक हेल्थ इंजिनिअर असने आवश्यक आहे.(२) महाराष्ट्र राज्यातील महापालिकाचे वर्गीकरण व त्या आधारे म.न.पा. सेवांची तीन सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांच्या पदासाठी शासन क्र. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग , शासन निर्णय क्रः संकिर्ण- १००५/ वर्गीकरण / प्र.क्र. ३७९ /०५ नवि-२४ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ४ मे २००६ नुसार पदांसाठी आकृती बंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये अ.क्र. २९ नुसार पर्यावरण संवर्धन अधिकारी असे पद उल्लेखीत केलेले आहे. व "ड " वर्ग महानगर पालिका करीता त्याची वेतन श्रेणी ८०००-१३५०० अशी नमूद आहे. या बाबत म.न.पा. प्रशासनाने विचार

केलेला दिसून येत नाही.(३) मा. शासन निर्णय क्र नगर विकास विभाग क्र. घकव्य / १००६/प्र.क्र. ५३ नवि-१६ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २६ ऑक्टो. २००६ नुसार घनकचरा व्यवस्थापनाकरीता घन कचरा व्यवस्थापन अभियंता / पर्यावरण अभियंता पद निर्माण करणे बाबत आदेश पारीत आहेत. या बाबत देखील म.न.पा. प्रशासनाने विचार केलेला दिसून येत नाही. (४) मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे पब्लिक हेल्थ इंजिनियर / पर्यावरण अभियंता ची नेमणूक करणे बंधन कारक आहे. सदर बाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे २ लाख ते ५ लाख लोकसंख्या असणा-या शहराने सहायक कार्यकारी दर्जाचा अभियंत्याची पद निर्मिती करणे बंधनकारक आहे. याबाबत देखील म.न.पा. प्रशासनाने विचार केलेला दिसून येत नाही. (५) तत्कालीन नगर परिषद असताना मा. सर्वसाधारण सभा क्र. २८ दि. १३/१/२००१ नुसार देखील मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाचे तंतोतंत पालन करणे बाबत ठराव पारीत आहे. (६) तरी आजच्या स्थायी समिती सभेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे पद निर्माण करून मनपाकडे पर्यावरण अभियांत्रीकी अथवा पदव्युत्तर पदवी धारण केलेला अधिकारी असल्यास त्यास सदरच्या पदावर नेमणूक करावे किंवा सदरची पात्रता असलेला कर्मचारी उपलब्ध नसल्यास अशी पात्रता धारण करणेस इच्छुक असणा-या कर्मचा-यास म न पा ने प्रशिक्षणास पाठवावे. त्यामुळे म न पा ला अतिरिक्त कर्मचा-याची नेमणूक करावी लागणार नाही व म.न.पा. आस्थापना खर्च देखील मर्यादीत राहील.(७) तसेच अनावश्यक असनारे व आस्थापण खर्च अनावश्यक वाढविणारे सहायक आयुक्त (घनकचरा व्यवस्थापण) हे पद निर्माण करू नये. या पदाचा मा सर्वोच्च न्यायालय किंवा शासन निर्णयामध्ये कुठलाही उल्लेख नाही. **(८)**तसेच साधारण चाळीस वर्षापूर्वी शहराची लोकसंख्या अंदाजे ५००० हजार असताना आरोग्य विभागामध्ये उपआरोग्याधिकारी हे पद निर्माण झालेले होते. आज शहराची लोकसंख्या पाच लाख असून पुर्वी पेक्षा त्यामध्ये दहा पट वाढ झालेली आहे. असे असताना उपआरोग्याधिकारी पदांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. तरी अस्तित्वात असलेले उप आरोग्याधिकारी पद व्यपगत करू नये.

आज शहरामध्ये आर सि एच कार्यक्रम, टी .बी. निर्मुलन, मलेरिया निर्मुलन, डेंगु निर्मुलन या सारखे अनेक सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यासाठी आरोग्य प्रशासनामध्ये अनेक आरोग्य प्रशासकीय (आरोग्याधिकारी, उप आरोग्याधिकारी, सहायक आरोग्याधिकारी) पदांची आवश्यकता आहे. तसेच शासन निर्णय क्र महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र : संकिर्ण- १००५/वर्गीकरण / प्र.क्र. ३७९/०५ नवि-२४ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.४ मे २००६ नुसार नुसार देखील "ड" वर्ग महानगर पालिके मध्ये सार्वजनिक सहायक आरोग्याधिकारी हे पद निर्माण करणे बाबत उल्लेख आहे, असे असताना सध्या उपलब्ध असणारे उपआरोग्याधिकारी पद रद्द करू नये. त्या एवजी सहा आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) हे पद निर्माण करण्याचे रद्द केल्यास आस्थापना खर्चाचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तरी वरीलप्रमाणे बाबींचा गांभिर्यपुर्ण विचार करून विषय क्र.९ बाबतमध्ये प्रशासनाने सुचविलेल्या पद निर्मीती मध्ये.१)पर्यावरण अभियंता हे पद निर्माण करावे.२)सहायक आयुक्त(घन कचरा)हे प्रस्तावीत पद निर्माण करण्याचे रद्द करावे.३) उपआरोग्याधिकारी हे असलेले पद रद्द करू नये.तरी सदर प्रकरणी विचार विनिमय करून मा. सभेने निर्णय घ्यावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.स्थायी समिती कडेस विभाग प्रमुखांनी मंजूरी साठी दिलेला प्रस्ताव मा. सदस्यांना जसाचे तसा झेरॉक्स करून कव्हरीग लेटर सह देण्यांत यावा. या पुढे याची दखल घ्यावी.

नगरसचिव श्री. हब्बु एस.ए. :- या पुढे त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- घन कचरा व्यवस्थापन विभागाबाबत मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पालण करणे बाबत.

वरील विषयानुसार कळविण्यांत येते की, आज दि.२८.७.०९ रोजी होणा-या मा.स्थायी समितीच्या मिटींग मध्ये विषय क्र.९ अन्वये म.न.पा. काही महत्वाचे पदे निर्माण करणे बाबत विषय आहे. सदर विषयांतर्गत माझा काही बाबी बाबत आक्षेप आहे.(१) सदर पदे निर्माण करताना घन कचरा व्यवस्थापण प्रमुख पदाबाबत काहीही उल्लेख नाही. सदर विभागाचे प्रमुख पदी मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पर्यावरण अभियंता / पब्लीक हेल्थ इंजिनिअर असने आवश्यक आहे. (२) महाराष्ट्र राज्यातील महापालिकाचे वर्गीकरण व त्या आधारे म न पा सेवांची तीन सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांच्या पदासाठी शासन क्र महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रः संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५ नवि-२४ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. ४ मे २००६ नुसार पदांसाठी आकृती बंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये अ क्र २९ नुसार पर्यावरण संवर्धन अधिकारी असे पद उल्लेखीत केलेल आहे. व "ड" वर्ग महानगर पालिका करीता त्याची वेतन श्रेणी ८०००-१३५०० अशी नमूद आहे. या बाबत म न पा प्रशासनाने विचार केलेला दिसून येत नाही. (३) मा.शासन निर्णय क्र नगर विकास विभाग क्र घकव्य/१००६/प्र क्र ५३ नवि-१६ मंत्रालय, मुंबई ४००३२ दि.२६ ऑक्टो २००६ नुसार घनकचरा व्यवस्थापणाकरीता घन कचरा व्यवस्थापण अभियंता / पर्यावरण अभियंता पद निर्माण करणे बाबत आदेश पारीत आहेत. या बाबत देखील म न पा प्रशासनाने विचार केलेला दिसनू येत नाही.(४) मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशा प्रमाणे पब्लिक हेल्थ इंजिनियर / पर्यावरण अभियंता ची नेमणूक करणे बंधन कारक आहे. सदर बाबत मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे २ लाख ते ५ लाख लोकसंख्या असणा-या शहराने सहायक कार्यकारी दर्जाच्या अभियंत्याची पद निर्मिती करणे बंधनकारक आहे. या बाबत देखील म न पा प्रशासनाने विचार केलेला दिसून येत नाही.(५) तत्कालीन नगर परिषद असताना मा सर्वसाधारण सभा क्र २८ दि.१३.१.२००१ नुसार देखील मा सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाचे तंतोतंत पालन करणे बाबत ठराव पारीत आहे.(६) तरी आजच्या स्थायी समिती सभेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाप्रमाणे पद निर्माण करून म न पा कडे पर्यावरण अभियांत्रीकी अथवा पदव्युत्तर पदवी धारण केलेला अधिकारी असल्यास त्यास सदरच्या पदावर नेमणूक करावे किंवा सदरची पात्रता असलेला कर्मचारी उपलब्ध नसल्यास अशी पात्रता धारण करणेस ईच्छूक असना-या कर्मचा-यास म.न.पा.ने प्रशिक्षणास पाठवावे. त्यामुळे म.न.पा.ला अतिरिक्त कर्मचा-याची नेमणूक करावी लागणार नाही. व म.न.पा. आस्थापणा खर्च देखील मर्यादीत राहील.(७) तसेच अनावश्यक असणारे व आस्थापण खर्च अनावश्यक वाढविणारे सहायक आयुक्त (घनकचरा व्यवस्थापण ) हे पद निर्माण करू नये. या पदाचा मा सर्वोच्च न्यायालय किंवा शासन निर्णयामध्ये कुठलाही उल्लेख नाही. (८) तसेच साधारण चाळीस वर्षापुर्वी शहराची लोकसंख्या अंदाजे ५००० हजार असताना आरोग्य विभागामध्ये उपआरोग्याधिकारी हे पद निर्माण झालेले होते. आज शहराची लोकसंख्या पाच लाख असून पुर्वी पेक्षा त्यामध्ये दहा पट वाढ झालेली आहे. असे असताना उपआरोग्याधिकारी पदांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. तरी आज अस्तित्वात असलेले उप आरोग्याधिकारी पद व्यपगत करू नये.

आज शहरामध्ये आर सि एच कार्यक्रम, टी .बी. निर्मुलन, मलेरिया निर्मुलन, डेंगु निर्मुलन या सारखे अनेक सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यासाठी आरोग्य प्रशासनामध्ये अनेक आरोग्य प्रशासकीय पदांची आवश्यकता आहे. तसेच शासन निर्णय क्र महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र : संकिर्ण- १००५/वर्गीकरण / प्र.क्र. ३७९/०५ नवि-२४ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.४ मे २००६नुसार नुसार देखील "ड"वर्ग महानगर पालिके मध्ये सार्व. सहायक आरोग्याधिकारी हे पद निर्माण करणे बाबत उल्लेख आहे, असे असताना सध्या उपलब्ध असणारे उपआरोग्याधिकारी पद रद्द करू नये. त्या एवजी सहा आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) हे पद निर्माण करण्याचे रद्द केल्यास आस्थापना खर्चाचा प्रश्न निर्माण होणार नाही.

तरी वरील प्रमाणे बाबींचा गांभिर्यपुर्ण विचार करून विषय क्र. ९ बाबत मध्ये प्रशासनाने सुचविलेल्या पद निर्मीती मध्ये १) पर्यावरण अभियंता हे पद निर्माण करावे. २) सहायक आयुक्त (घन कचरा) हे प्रस्तावीत पद निर्माण करण्याचे रद्द करावे. ३) उप आरोग्याधिकारी हे असलेले पद रद्द करू नये.ही विनंती.

याप्रमाणे माझे म्हणून असून हे माझे लेखी म्हणणे मा.सभापती साहेब यांचेकडेस निवेदनाद्वारे देत आहे. त्याचा मा.सभेने विचार करावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची तीन सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांच्या पदांसाठी आकृतीबंध निश्चित करणे बाबत मा. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक :संकिंण- १००५/वर्गीकरण/प्र.क्र. ३७९ /०५ नवि-२४ मंत्रालय,मुंबई ४०००३२ दिनांक ४ मे २००६ ला जी.आर. काढलेला आहे. महानगरपालिकेचे चार विभागामध्ये अ,ब,क,ड असे वर्गीकरण केलेले असून म.न.पा.चे कायम आस्थापना सुची वरील ३८ पदांचे आकृतीबंध कसा असेल याची त्यामध्ये नोंद आहे.या जी.आर. प्रमाणे निश्चित केलेल्या पदाना मा.स्थायी समिती सभेने मंजूरी दिल्या नंतर मा. महासभेची त्यास मंजूरी घेउन्न प्रस्ताव मा. शासनाकडेस मंजूरी साठी पाठविण्यांत येणार आहे. आपली म.न.पा. स्थापन होउन सहा वर्षे झालेली आहेत. अहमदनगर मनपाने प्रशासनाचे दृष्टीने चार प्रभाग कार्यालये सुरू केलेली असून त्या प्रतेंक प्रभाग कार्यालयासाठी उपायुक्त दर्जाच्या अधिका-यांची नेमणूक असणे आवश्यक आहे. मा. शासनाचे जी.आर. प्रमाणे अधिका-यांच्या पदांसाठी आकृतीबंध या पुर्वीच निश्चित घेणे आवश्यक होते. परंतु ते या पुर्वी झालेले नाही मा. आयुक्त श्री. केळकर साहेबांनी या प्रकरणांस चालना दिलेली आहे. प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे मंजूरी साठी सादर केलेला आहे. सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब , श्री. थोरात इत्यादी अधिकारी हे रिटायर होतील तेव्हा मनपामध्ये काम करण्यांस कोण अधिकारी असेल घनकचरा आरोग्य रस्ते इत्यादी बाबत महत्वाची कामे आहेत नागरिकांची सोई सुविध साठी सतत मागणी असते. या प्रस्तावास मा. स्थायी समितीने मंजूरी दिले नंतर तो मा. महासभेपुढे चर्चे साठी सादर करणेत येईल मा. महासभेमध्ये त्यावर मा.सदस्यांनी सविस्तर चर्चा करावी व मंजूरी घ्यावी तद्नंतर तो मा. शासनाकडेस मंजूरी साठी पाठविला जाईल मा. शासन त्यावर सांगोपांग विचार करून निर्णय घेतील म.न.पा.ची लोकसंख्या आस्थापना खर्च इत्यादी बाबतचा विचार करून त्यांचे फॉर्मेट प्रमाणे ते मंजूरी देतील आपले प्रस्तावा प्रमाणे ते मंजूरी देणार नाहीत. मा. स्थायी समिती सदस्य यांनी प्रस्तावास चालना देणे कामी मंजूरी द्यावी त्यावर मा. महासभे मध्ये सविस्तर चर्चा करावी तेथे

मा.आयुक्त साहेब माहिती देतील सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यां मधूनच दोन अधिका-यांची पदे भरली जाणार आहेत. अनावश्यक आनाढाई पदे भरली जाणार नाहीत. भिवंडी निजामपूर मनपा येथे या पूर्वीच हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. खालचे लोकांना तेथे पदोन्नती दिलेला आहे इथे ही पदे ही इन्टरव्हू घेउन्न भरणार आहोत आपले मनपामध्ये कामास अधिकारी कमी आहेत मा.सभागृहास विनंती आहे की त्यानी सदरचा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कर्मचा-यांना प्रशिक्षणास पाठवून त्यांना अधिकारी म्हणून तयार करणेची तरतुद आपले कडेस नाही का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- अशा प्रकरणे प्रशिक्षणाची सोय नाही. आपण मा. शासनाकडेस जसा प्रस्ताव पाठवितो तो तसाचे तसाच मंजूर होत नाही दहा पदे आवश्यक असतांना पांच पदांना मंजूर मिळते. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी मिळाले नंतर ही पदे भरल्या नंतरच खराखेर अ.नगर पालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले सारखे होईल.

मा.श्रीमती ढोणे मा.सु. :-आम्हाला दिलेल्या अजेंडया मध्ये पदांचा तक्ता दिलेला नाही. घनकचरा व्यवस्थापन पदा बाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय काय आहे ?.

मा.श्री. पवार बा.रे. :- प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव मा. सदस्यांना दिलेला नाही पदोन्नतीने किती पदे भरावयाची या बाबतचे डिटेल देण्यांत यावे. प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचा प्रस्ताव,पदांना मंजूरी मिळणे साठी पाठविणे आहे पदे भरणे विषयी नाही.

मा.श्री. शेंडगे सं.छ. व मा.श्री. पंजाबी ज.नि. :- प्रस्ताव स्थगित ठेवा सदस्यांना सविस्तर माहिती देण्यांत यावी.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :-महानगरपालिकेचे नगरसचिव व विभाग प्रमुखांना सुचना दिलेल्या आहेत.

मा.श्री. पवार बा.रे.:- प्रस्ताव तहकुब ठेवावा.

मा.श्री. पवार द.ज.:- तहकुब ठेवावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते प्रस्ताव तहकुब ठेवणेत यावा. मा. सदस्यांना प्रस्तावाची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापना कायम सुचीवर विविध पदे निर्माण करणे बाबतचे प्रस्तावास मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव तहकुब.

सुचक :- मा.श्री.पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १० मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १० मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत (IHSDP)सविस्तर प्रकल्प अहवाल(DPR)तयार करणे करीता कन्सलटंट/आर्किटेक्ट नेमणुकी बाबतच्या तुलनात्मक तक्त्यास व सदर कामी आलेल्या / येणा-या खर्चास मान्यतेसाठी ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय :-एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत (IHSDP) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे करीता कन्सलटंट / आर्किटेक्ट नेमणुकी बाबत.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती अहवाल देण्यात येतो की, मा.केंद्र शासनाच्या एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने करीता अहमदनगर महानगरपालिकेने फेर निविदा मागविले होते. त्यानुसार एकूण २ निविदा प्राप्त झाले आहे. दोन्ही निविदा धारकांनी सदर योजनेच्या प्रकल्प अहवालामध्ये सर्व्हेक्षण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे व शासनाकडून प्रकल्प अहवालाला मंजूरी घेणे या बाबत निविदा मध्ये देकार नमूद केलेला आहे.प्राप्त निविदा धारकांनी निविदा मध्ये कामांवर तांत्रिक देखरेख ठेवणे बाबत काही नमूद केलेले नाही. तद्नंतर सदरचा विषय छाननी समिती समोर ठेवला असता छाननी समितीने मे. आर्क असोसिएट, औरंगाबाद या प्राप्त निविदातील सर्वात कमी दर असलेला निविदाधारका बरोबर वाटाघाटी केली असता निविदा धारकाने एकूण प्रकल्प किंमतीच्या ३.९०% दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.त्यानुसार छाननी समितीने मे.आर्क असोसिएटस, औरंगाबाद या निविदा धारकाची शिफारस करून मा. स्थायी समितीकडे मंजूरीसाठी सादर केले.

मा.स्थायी समिती अद्याप पर्यत गठीत न झाल्यामुळे प्राप्त निविदा मंजूरीसाठी कालावधी लागणार असल्याने मा. नगर सचिव यांनी तसा अहवाल दिला आहे. मा. प्रधान सचिव गृह निर्माण विभाग, मुंबई-३२ यांनी दुरध्वनी वरून दि. १५/१/०९ रोजी दिलेल्या सुचनेनुसार योजनेचा प्रकल्प आराखडा दि. ५/२/०९ पुर्वी मा. केंद्र शासनाकडे सादर करणे आवश्यक असल्याचे सुचित केले होते. हे सर्व कामे जलद गतीने करावयाचे असल्याने मा.आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये पहिल्या टप्प्यातील खर्चास मान्यता दिली आहे. तद्नंतर मा. स्थायी समिती गठीत झाल्यानंतर प्रस्ताव मा.स्थायी समितीस मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.

मा.महाराष्ट्र शासनाच्या गृह निर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र. जनेयो २००६/प्र.क्र.४६ / गृनिधो-२ दि.१८ सप्टेंबर २००६ अन्वये स्थानिक स्वाराज्य संस्था / अंमलबजावणी यंत्रणा यांनी त्यांच्या शहरा करीता तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे तसेच तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करणे करीता प्रकल्प खर्चाच्या ५% इतकी रक्कम राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने वापरण्याची मुभा राहील असे नमूद केले आहे. मंजूर निविदेच्या निविदा धारकांनी एकूण प्रकल्पाच्या ३.९०% इतकी रक्कम निविदा मध्ये मंजूर केली आहे. मे. आर्क असोसिएट, औरंगाबाद यांनी त्यांच्या निविदेमध्ये खालील प्रमाणे कामाच्या टप्प्यानुसार देयका बाबत दर नमूद केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचा टप्पा | देयक % | एकूण देयक % |
|---|---|---|---|
| १. | कामाकरीता ॲडव्हान्स | ३०% | -- |
| २. | नकाशे सादर केल्यानंतर | ३०% | ६०% |
| ३. | डि.पि.आर. सादर करते वेळी | २०% | ८०% |
| ४. | डि.पि. आर. मंजूरी नंतर | २०% | १००% |

सदर बाबत दि.२७/१/०९ रोजी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये मे.आर्क असोसिएट, औरंगाबाद यांचेशी उपरोक्त निविदेबाबत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये मा.आयुक्त साहेब यांनी संबंधीत एजन्सीस त्यांनी निविदा मध्ये नमूद केलेल्या ॲडव्हान्स बाबतचा मुद्दा अमान्य केला व एकूण प्रकल्प अहवालाच्या ३.९०% दराने प्रकल्प अहवाल तयार करून मा. शासनाकडे मंजूरीस पाठविणे व सदर प्रकल्प अहवालाच्या मा.राज्य शासन व केंद्र शासनाची मंजूरी घेणे इ. बाबी मान्य केलेले आहे. करावयाचे कामावर तांत्रिक देखरेख ठेवणे करीता प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट नेमणूक करणे बाबत सुचित केले. सदर बाबत निविदा धारक मे.आर्क असोसिएट, औरंगाबाद यांनी दि. २७/१/०९ रोजी झालेल्या बैठकीनुसार लेखी पत्र देवून कन्सलटींग चार्जेस बाबत कळविले आहे तसेच कार्यारंभ आदेश देणे बाबत सुचित केल्यानुसार.

तद्नंतर सदरच्या प्रस्तावामध्ये मा.उपायुक्त (कर) यांनी 'अ' नुसार मान्यतेस्तव सादर केल्यानंतर मा.आयुक्त साहेब यांनी सर्व्हेक्षण, नकाशे ,अंदाजपत्रक तयार करणे ३०% DPR तयार करणे शासनास सादर करणे २०% DPR शासनाकडुन मंजूरीनंतर १००% प्रमाणे सदरचे देयक अदा केले जातील असे सुचित केल्यानुसार त्याप्रमाणे संबंधीत मे. आर्क असोसिएट, ७ चेंतन सुपर मार्केट , त्रिमुर्ती चौक, औरंगाबाद यांचेकडून सदरच्या प्रोजेक्ट बाबत करारनामा करून घेण्यात आलेला आहे. करारनामा झाल्यानंतर संबंधीतांना मनपा जा.क्र. १८१८ दि.२९/१/०९ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणे संबंधीत आर्किटेक्ट यांनी मोरचूदनगर (संजयनगर ) सर्व्हे नं.५ व नालेगांव सर्व्हे नं. २२०/२२१ या जागेचे प्रत्यक्ष मोजणी करून ४८० सदनिकेचा प्रस्ताव सादर केल्यानंतर सदरचा प्रस्ताव मनपा सार्वजनिक बांधकाम विभाग जा.क्र. १८५७ दि. ४/२/०९ अन्वये मुख्यधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचेकडे सादर करण्यात आला. तद्नंतर नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नाशिक (म्हाडा) सदर प्रस्तावाची छाननी करून दि. २/३/०९ रोजी सदरचा प्रस्ताव मुख्यधिकारी गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांचे मार्फत मुख्य अभियंता क्र.-२ म्हाडा मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे. तसेच मे.आर्क असोसिएट, औरंगाबाद यांनी नमुद केल्याप्रमाणे रू. ७.८० लक्ष चे देयक मा.आयुक्त साहेब यांचेकडे सदरचा प्रस्ताव ठेवला असता त्यावर मा.आयुक्त साहेब यांनी मान्यता दिली असून सदरचे देयक मे.आर्क असोसिएट, औरंगाबाद यांना देण्यात आलेले आहे. तरी तुलनात्मक तक्त्यास व आलेल्या खर्चास व येणा-या खर्चास मान्यता मिळावी. सदरचा रिपोर्ट मान्यतेसाठी सविनय सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत (IHSDP)सविस्तर प्रकल्प अहवाल(DPR)तयार करणे करीता कन्सलटंट/आर्किटेक्ट नेमणुकी बाबतच्या तुलनात्मक तक्त्यास व सदर कामी आलेल्या / येणा-या खर्चास मान्यतेसाठी ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा. सभापती साहेब :- म.न.पा.चे एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणे कामी आर्किटेक्ट नेमणूकी बाबतचे तुलनात्मक तक्त्यास व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे इंजि. श्री.मेहत्रे आर.जी. यांनी ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविला.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- आर्किटेक्ट यांनी सदर योजनेचे काम केलेले आहे का ?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आता पर्यत केलेल्या कामाची सभागृहास माहिती द्यावी.

इंजि. श्री. मेहत्रे आर.जी. :- आर्किटेक्ट यांनी मोरचूदनगर (संजयनगर ) सर्व्हे नं.५ व नालेगांव सर्व्हे नं. २२०/२२१ या जागेचे प्रत्यक्ष मोजणी करून ४८० सदनिकेचा रूपये दहा कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर योजने मध्ये २२५ चौ. फुट क्षेत्राची सदनिका असुन त्याची किंमत रूपये एक लाख पंचवीस हजार रूपये असणार आहे. लाभार्थीयांना मागासवर्गीयासाठी रूपये दहा हजार पांचशे फक्त व आर्थिक दुर्बल घटकासाठी रूपये बारा हजार पांचशे फक्त असा हिरसा भरावा लागणार आहे. सदरचा प्रस्ताव हा एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत डी.पी.आर. तयार करणे करिता कंन्सलटंट / नेमणे विषयी आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- केडगांव भागातील स्लम मध्ये हया योजने अंतर्गत कामे घेतलेली आहेत का ?

इंजि. श्री. मेहत्रे आर.जी. :- संजयनगर व नालेगांव सर्व्हे नं.२२०/२२१ मध्ये सध्या हया योजने अंतर्गत कामे घेतलेली असून म.न.पा. हद्दी मधील सर्व झोपडपट्टया,कोठला, अचानक वस्ती पवार चाळी मध्ये ही कामे घेतली जाणार आहेत.

मा.श्री. भोसले ग.पु.:- महानगरपालिकाचे घोषीत स्लम मध्येच ही कामे होणार का ?

इंजि. श्री. मेहत्रे आर.जी..:- सर्वच झोपडपट्टयामध्ये या योजने अंतर्गत कामे घेतली जाणार आहेत.

मा.सभापती साहेब :- या योजने अंतर्गत करावयाचे कामा संबंधी चर्चा करणेसाठी स्लम एरिया प्रभागामध्ये असणा-या सर्वच नगरसेवकांची मिटींग शनिवारी आयोजित केलेली आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- संजयनगर भागात अतिक्रमण झालेले आहे. या झोपडपट्टया घोषीत आहेत का?

इंजि. श्री. मेहत्रे आर.जी. :- घोषीत अगर अघोषीत अशा दोन्ही ही स्लम भागात ही योजना राबविणेत येणार आहे. झालेली अतिक्रमणे काढून ही योजना राबविणेत येणार आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- आमचे प्रभागामधील झोपडपट्टीमध्ये ही कामे घेण्यांत यावीत.

मा.श्री. बारस्कर पो.ज:- आर्किटेक्ट चे फी बाबत माहिती द्यावी त्यांना किती टक्के देणार आहाता.

इंजि. श्री. मेहत्रे आर. जी.:- सदर योजने अंतर्गत आर्किटेक्ट यांना रू. ३५ लाखापर्यत फी अदा करावी लागणार आहे व सदर फी आपणांस शासकीय अनुदानामध्ये मंजूर होणारी आहे. औरंगाबाद येथील मे. आर्क असोसिएट यांनी प्रकल्प किंमती च्या ३.९० दराने काम करण्यांस मान्यता दिलेला असून त्यास मंजूरी प्राप्त झालेली आहे.

मा.श्री. शेंडगे सं.छ.:- सदर आर्किटेक्ट फी योजना फायनल केले नंतर किंवा कसे देणार ?
इंजि. श्री. मेहत्रे आर.जी. :- टप्या टप्याने आर्किटेक्ट फी देणेत येणार आहे.
मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.श्री. भोसले ग.पुं. :- मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत (आय.एच.एस.डी.पी.) सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) तयार करणे करीता कन्सलटंट/आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे बाबत मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मे. आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या प्रकल्प किंमतीच्या ३.९० % (तीन पुर्णांक नव्वद शतांश टक्के) दरास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ११ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ११ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मार्केट विभाग मार्फत रस्ताच्या कडेला बसणारे भाजी विक्रेते, फळविक्रेते, चहा व पानाच्या टप-या, हातगाडीवाले व तत्सम विक्रेते यांच्याकडून रस्ता बाजु फी निविदा पध्दतीने वार्षिक ठेका वसुलीस देणे बाबत निविदा काढणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सविनय सादर,

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, म.न.पा.चे मार्केट विभाग मार्फत रस्ताच्या कडेला बसणारे भाजी विक्रेते, फळविक्रेते, चहा व पानाच्या टप-या, हातगाडीवाले व तत्सम विक्रेते यांच्याकडून रस्ता बाजु फी प्रती स्के. फुट रू. ०.५० /- किंवा कमीत कमी रू. १०/- दराने रस्ता बाजु फी वसुल केली जाते. सदर फि वसुली करीता एकुण ८ वर्ग ४ (शिपाई, बिगारी) चे कर्मचा-याची नेमणुक करण्यांत आली आहे. त्यांच्याकडून सरासरी दररोज रू. २२००/- चे आसपास रस्ता बाजु फि वसुली केली जाते.

सदर बाबत नमुना सर्व्हे केला असता अंदाजे १५७०/- विक्रेते आढळुन आले आहेत. त्याप्रमाणे दैनंदिन भरणा रू. १५७००/- होणे अपेक्षित आहे. मात्र वारंवार अतिक्रमण विभागाकडुन होणारी कार्यवाही, विक्रेत्यांकडुन होणारी दमदाटी, आरेरावीची भाषा, सदर फी देण्यास नकार देणे. विविध संघटना, संस्था, कार्यकर्ते यांचा वसुली कामी येणारा व्यत्यय, पावसाळयात, उन्हाळयात म.न.पा. मार्फत विक्रेत्यांना सुविधा उपलब्ध न केल्यामुळे त्याचा सदर फी देण्यास नकार अपुरा कर्मचारी वर्ग उपलब्ध कर्मचारी ८ हुद्दा (शिपाई, बिगारी) एम.जी. रोड, गंजबाजार, मोचीगल्ली, येथील विक्रेत्यांचा फि देण्यास नकार इ. बाबीमुळे सदर फि ची वसुली कमी होत आहे.

त्यामुळे रस्ता बाजु फि वसुली निविदा पध्दतीने दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होवुन सदर कर्मचारी इतर कार्यालयीन कामकाजाकरिता नेमणुक करता येईल.

सदर बाबत नमुना सर्व्हे मध्ये आढळलेले विक्रेते १५७० X रू .१०/- फी = १५७००/- X ३६५ दिवस = ५७,३०,५००/- अंदाजे रू. ६० लाख निविदा किंमत येवुन शकते तथापी सदर बाब धोरणात्मक असल्याने मा. नगररचनाकार व अतिक्रमण विभाग यांचा सदर बाबतीत अभिप्राय घेवुन वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणे योग्य वाटते. तसेच झालेला सर्व्हे हा सन २००८ मध्ये झालेला असुन यात विक्रेत्यांची वाढ होवुन शकते. त्या अनुषंगाने १० % ते २० % वाढ होवु शकते आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे दि.७/०१/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.सभापती साहेब :- मागिल तीन वर्षाची रस्ता बाजू फी चे आकडे पहाता सदरचे वसुली मध्ये बरीच तफावत आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- तीन वर्षाचे म.न.पा. मार्फत केलेल्या रस्ता बाजू फी वसुलीचे आकडे पहाता सरासरी वार्षिक दहा लाख वसुल होताना दिसते त्याचा ठेका साठ लाखाची कसा जाणार.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- वसुली अधिकारी यांनी माहिती सांगावी.

वसुली अधिक्षक श्री. निंबाळकर डी.बी. :- रस्ता बाजू फी वसुली साठी पूर्वी जादा कर्मचारी होते आता वर्ग चार मधील (शिपाई, बिगारी) आठ कर्मचा-यामार्फत सदर फी वसुल केली जाते. त्यांचे कडून दररोज सरासरी रू.२,२००/-चे आसपास रस्ता बाजू फी वसुली होते. अतिक्रमण विभागाकडून होणारी कार्यवाही,विक्रेत्या कडून होणारी दमदाटी, आरेखवीची भाषा,फी कुनी देतात, कुनी देत नाही. एम.जी. रोड गंजबाजार मोचीगल्ली येथील विक्रेत्यांचा फी देण्यांस नकार वसुली कर्मचारी सक्षम नसणे यामुळे वसुली कमी होते आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- माजी प्राचार्य यांचे समोर घडलेला प्रसंग त्यानी मला सांगितला की त्यांचे समोर रस्ता बाजू फी वसुली करणारानी भाजी विक्रेत्यांस पावती न देता फी वसुल केली यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा.श्री. भोसले ग.पु.:- रस्ता बाजू फी प्रकरणी रूपये ६० लाखाची फिगर कशी आली सांगावे.

मा.उपायुक्त डॉ. श्री. जावळे साहेब :- म.न.पा.चे प्रभाग अधिकारी यांचे मार्फत नमुना सर्व्हे केला असता म.न.पा. शहर हद्दीमध्ये अंदाजे १५७० विक्रेत्यांची संख्या निश्‍चित झाली होती. सदर नमुना सर्व्हे मध्ये आढळलेले विक्रेते १५७०xरू.१० प्रमाणे रस्ता बाजू फी =एकूण रू.१५,७००/- प्रतिदिनी प्रमाणे ३६५ दिवसाचे रक्कम रूपये ५७,३०,५००/- अशा रक्कम येते आहे. त्या नुसार ठेका रक्कम अंदाजे रू.६० लाख किंमत येउ्र शकते. वस्तुतः रस्ता बाजू फी ठेका पध्दतीने दिल्यास त्या पेक्षा जादा दराने ठेका जाणार आहे करिता सभागृहास विनंती की रस्ता बाजू फी वसुली ठेका पध्दतीने दिल्यास म.न.पा.ला फायदाच होणार आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-आपले म.न.पा.चे सुरूवातीचे नाका उत्पन्न कमी होते. परंतु जकात वसुली ठेवा पध्दतीने दिल्या नंतर एकदम जकात ठेका चार कोटी जादाने गेला. मा.उपायुक्त श्री. जावळे साहेबांनी सांगितलेल्या हिशोबा प्रमाणे साठ लाखाचा ठेका कमी जास्त होउ्न ५२ लाखाला जाईल पण तोच ठेकेदार हा ठेकेदार पुढील वर्षी जादा रकमेला घेईल. रस्ता बाजू फी वसुली ठेका पध्दतीने दिल्यास म.न.पा. चा त्यामध्ये फायदाच होईल ठेक्याची खरी किंमत निविदा आले नंतरच समजेल.

मा.श्री. पवार बा.रे. :- म.न.पा. मार्केट विभागाकडील उपलब्ध आकडेवारी नुसार रूपये ६० लाख रकमेचे रस्ता बाजू फी वसुली ठेका पध्दतीने देण्यांस मंजूरी देण्यांत यावी. परंतु ठेकेदाराने जादा वसुली करू नये दहा चे वीस घेउ्र नये यासाठी ठेका करारामध्ये या अटी शर्तीचा उल्लेख करण्यांत यावा.

मा.श्री.शेख न.अ.र.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे.. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या मार्केट विभाग मार्फत रस्ताच्या कडेला बसणारे भाजी विक्रेते, फळविक्रेते, चहा व पानाच्या टप-या, हातगाडीवाले व तत्सम विक्रेते यांच्याकडून रस्ता बाजु फी रक्कम रूपये ६०,००,०००/-(रूपये साठ लाख फक्त) वसुलीचा ठेका वार्षिक कंत्राटी पध्दतीने जाहिर निविदा मागवून देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख नजीर अहमद अ. रज्जाक.

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये विविध कंपन्यांकडून जमीन अंतर्गत टेलीफोन केबल (Optical Fibar Cabal) टाकणा-या संस्थांकडुन रॉयल्टी घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा. सादर,

विषय :- जमीन अंतर्गत टेलीफोन केबल (Optical Fibar Cabal) टाकणा-या संस्थांकडुन रॉयल्टी घेणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन निर्णय क्र.डीआटी/ फाईल-०३/३३६ दि.१/४/२००६

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध कंपन्यांकडुन जमीन अंतर्गत टेलीफोन केबल टाकल्या जातात. सदर बाबत शहर अभियंता हे स्वतः पुणे महानगरपालिकेमध्ये जावून त्यांनी या बाबत माहिती घेतलेली आहे.

सदर कंपन्यांकडुन विविध सेवा सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने रस्त्यांच्या खोदकाम करून जमीनीखाली विविध संस्थांमार्फत केबल टाकण्यात येतात. ज्या ठिकाणी डक्टची सुविधा नसेल तेथे रस्त्यांचे कडेने खोदकाम करून या केबल टाकल्या जातात. प्रचलीत पध्दतीनुसार या संस्थांकडुन रस्ता खोदाई चार्जेस केवळ आकारण्यात येतात. परंतु या जागेचा वापर या संस्था व्यवसाईक नफा मिळविण्याच्या उद्देशाने करतात व त्याबाबत मात्र कोणतेही शुल्क आकारले जात नाही. संदर्भांकीत शासन निर्णयानुसार अशा डॉक्टस् / कंडक्ट अगोदर टाकल्या असतील अशा ठिकाणी रस्ते / स्थानिक प्राधिकरणे, परवानाधारकांकडून योग्य ते शुल्क वसुल करून त्यांना अशा डॅक्टस् कंडक्ट यांच्यामधुन केबल टाकण्यास आदेश देउ शकतील असे ठरविण्यात आले. त्यामुळे जमिनी अंतर्गत केबल्स टाकणा-या संस्थांकडून खालील प्रमाणे स्वामीत्वधनापोटी रकमा वसुल करणे योग्य वाटते. सदर बाबत पुणे महानगरपालिकेत त्यांच्या मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्रमांक १७२६ दिनांक ६/१/२००९ अन्वये विषय मंजूर केलेला आहे. सदर ठरावाची प्रत सोबत जोडली आहे.

**डक्टमधील केबल्ससाठी**

१) पी.व्ही. सी. :- रू. ३,६००/- प्रति मीटर

२) आर.सी.सी. :- रू.४,५००/- प्रति मीटर

३) रस्ता खोदून टाकलेल्या केबलसाठी :- रू. २,५००/- प्रति मीटर.

तरी वरील प्रमाणे टेलीफोन कंपन्यांकडून भुईभाडे वसुल केल्यास महानगरपालिकेस मोठया प्रमाणात उत्पन्न मिळु शकेल. तरी सदरच्या कामास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे प्रस्ताव अवलोकनार्थ व मंजुरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि ६/३/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- म.न.पा. हद्दी मध्ये जमिन अंतर्गत टेलीफोन केबल टाकणा-या विविध कंपन्याकडून रॉयल्टी घेणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शहर अभियंता यांनी माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध कंपन्याकडून जमिन अंतर्गत केबल टाकल्या जातात सदर बाबत मी स्वताः पुणे महानगर पालिकेमध्ये जाउन त्यांचेकडून माहिती आनलेली आहे. आपले म.न.पा. हद्दीमध्ये विविध संस्था मार्फत केबल टाकल्या जातात त्यांचे

कडून प्रचलीत पध्दती नुसार फक्त रस्ता खोदाई चार्जेस आकारले जातात. त्यांचे कडून त्या बाबतचे शुल्क आकारले जात नाही. संदर्भाकिंत शासन निर्णय क्र.डीआटी/ फाईल-०३/३३६ दि.१/४/२००६ चे निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७२६ दिनांक ६/१/२००९ अन्वये चे ठरावाने भुईभाडे वसुल करणेस मंजूरी दिलेली आहे. त्यांचे प्रमाणे जमिनी अंतर्गत केबल्स टाकणा-या संस्था कडून स्वामित्वधनापोटी

**डक्टमधील केबल्यसाठी**

१) पी.व्ही. सी. :- रू. ३,६००/- प्रति मीटर

२) आर.सी.सी. :- ४,५००/- प्रति मीटर

३) रस्ता खोदून टाकलेल्या केबलसाठी :- रू. २,५००/- प्रति मीटर.

याप्रमाणे टेलीफोन कंपन्याकडून केबल्स टाकणे साठी भुईभाडे वसुल करणेचे प्रस्तावास मा. सभेने मंजूरी दिल्यास म.न.पा.ला भविष्यात कोटया वर्धाचा निधी मिळू शकतो.

मा.श्री. भोसले ग. पु.:- आपण अशा संस्थाकडून रस्ता खोदाई म्हणून चार्जेस वसुल करतो ना ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी.:- होय आपण वार्षिक भाडे घेतो.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मागिल वर्षी या प्रमाणे वसुली होती का ?

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- रस्ता क्रॉसिंग करून केबल टाकली जाते तेव्हा रस्त्यावर खड्डा पडतो. कधी कधी पाण्याची पाईप लाईन फुटली जाते. नागरिकांना त्याचा जास्त त्रास होतो.

मा.सभापती साहेब :- केबल टाकताना म.न.पा.चा कर्मचारी सदर ठिकाणी ठेवावा. पिण्याचे पाण्याचे पाईप लाईनचे नुकसान होउ नये.या साठी खबर दारी घेण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये जमीन अंतर्गत टेलीफोन केबल (Optical Fibar Cabal) टाकणा-या विविध कंपन्यांकडून संस्थांकडुन खालीलप्रमाणे

**डक्टमधील केबल्ससाठी**

१) पी.व्ही. सी. :- रू. ३,६००/- प्रति मीटर

२) आर.सी.सी. :- रू.४,५००/- प्रति मीटर

३) रस्ता खोदून टाकलेल्या केबलसाठी :- रू. २,५००/- प्रति मीटर.

तरी वरीलप्रमाणे टेलीफोन कंपन्याकडून भुईभाडे वसुल करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मात्र सदर कंपनी चे केबल टाकणेचे कामावर सुपरव्हिजन साठी म.न.पा.चे कर्मचा-यांची नेमणूक करणेत यावी व त्याने केबल टाकतांना पिण्याचे पाण्याचे पाईप लाईनचे नुकसान होऊ नये याची व रस्त्यावर खड्डे पडू न देण्यांची दक्षता घेणेत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये बुरूडगांव ते बुरूडगांव स.नं. ३४ पर्यत रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय-निविदा मंजुरीबाबत

कामाचे नांव :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये बुरूडगांव रोड ते स.नं. ३४ पर्यत रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

महोदय,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त यांची दि.१८/१२/२००८ अन्वये कामांस मंजुरी
२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- ७०,८९,९०४/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- ७०,८९,९०४/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- २००८-०९
५] निविदा (परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- ६७,९०,००१/-
६] निविदा प्रसिध्दी तारीख :- ३०/१/०९ दै. सकाळ व दि.३१/१/०९ दै. लोकयुग
७] निविदा विक्री कालावधी :- ३०/१/०९ ते १३/२/०९ (पंधरा दिवस)
८] निविदा स्विकारण्याची तारीख :- १७/२/०९
९] निविदा उघडण्याची तारीख :- १७/२/०९
१०] कामाची मुदत :- ६ महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील:-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. ए.सी. शेख | २७ % जादा |
| २ | मे. ए. सी. कोठारी | १७.९९ % जादा |
| ३ | मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन | १९.९९ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी. कोठारी यांचा देकार सर्वात कमी म्हणजे १७.९९% जादा आहे. कमी दराचे निविदा धारकास अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. १९४४ दि. १८/२/०९ अन्वये पत्र दिले असता संबंधीत ठेकेदार यांनी २१/२/०९ रोजी सदरचे काम ९.९९ % जादा दराने करणेस तयार असले बाबत कळविले आहे. सन २००८-०९ चे दरसुचीनुसार तुलना करता सदर दर ५% जादा येत आहे. सदर प्रस्ताव दि. २१/२/०९ रोजी छाननी समिती समोर ठेवला असता ठेकेदाराचा निविदा रकमेपेक्षा ५% जादा दर मंजूरीबाबत शिफारस करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार होणारी कामाची किंमत | रू. ६७,९०,००१/- |
| २ | चालु दरसुची सन- ०८-०९ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. ७१,२९,५०१/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक (१-२) | रू. ३,३९,५००/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x१००)<br>२ | ५ % जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

त्यानुसार सन २००८-०९ चे सुधारीत दरसुचीनुसार सदरचा देकार ५ % जादा येत आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.१५/५/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव रोड भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- छाननी समितीने मध्ये कोण कोण आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा.आयुक्त साहेबांनी नेमलेल्या कमिटी मध्ये मी उपायुक्त (कर),सहाय्यक आयुक्त, शहर अभियंता, मुख्यलेखधिकारी यांची, कमेटी आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- बुरूडगांव मनपा हद्दीतुन वगळणेचे चालले आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- म.न.पा. हद्दीत आहे. तो पर्यत कामे घ्यावीत.

मा.श्री. भोसले ग.पु.:- रस्ता कोठून कुठपर्यत डांबरी करणार आहेत.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- कचरा डेपो कडे जाणारा रस्ता आहे तो बुरूडगांव ते बुरूडगांव सर्व्हे नं.३४ पर्यत प्रस्तावीत केलेला आहे. त्याचीं लांबी ३१०० मीटर रूंदी ६ मीटर आहे सध्याचा रस्ता ३ मीटर आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- त्यामध्ये पुलाचे काम घेतले आहे का?

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- पुलाचे काम घेतलेले असून अतिक्रमणे काढून घेउन रस्त्याचे काम होणार आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं.:- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये बुरूडगांव ते बुरूडगांव स.नं. ३४ पर्यत रस्ता रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे कमीचे निविदा दर धारक मे.ए.सी. कोठारी अहमदनगर यांचे सन २००८-२००९ चे दरसुची नुसार ५%(पांच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीत (सन २००९-१० ) टँकर्सद्वारे पाणी टंचाई क्षेत्रात पाणी वाटप करणे कामी, टँकर्स भाडे तत्वावर लावणे कामी निविदा मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय- निविदा मंजूरी बाबत अ.नगर महानगरपालिका हद्दीत टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे (सन-०९-१०)

विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पाणी टंचाई क्षेत्रात पाणी वाटप करणे कामी टँकर्स भाडे तत्वावर लावणे कामी निविदा मागविण्यांत आली, या बाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] निविदा प्रसिध्दी तारीख :- २७/१/०९ दै. सामना

२] निविदा विक्री कालावधी :- २७/१/०९ ते १०/२/०९ (पंधरा दिवस)

३] निविदा स्विकारण्याची तारीख :- १३/२/०९

४] निविदा उघडण्याची तारीख :- १६/२/०९

५] कामाची मुदत :- १२ महिने

६] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | टॅंकर क्षमता | प्रति दिन भाडे | प्रति कि. मी. दर |
|---|---|---|---|---|
| **१** | **मे.दिपाली ट्रान्सपोर्ट,अ.नगर** | **३ मे. टन** | **९००/-** | **८.९५/-** |
| | | **४ मे. टन** | **९००/-** | **९.००/-** |
| | | **१० मे. टन** | **१०७५/-** | **१०.७५/-** |
| २ | मे. गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर | ३ मे. टन | ९००/- | ९.००/- |
| | | ४ मे. टन | ९२५/- | ९.२५/- |
| | | १० मे. टन | १०८५/- | ११.७५/- |
| ३ | मे.विक्रांत ट्रान्सपोर्ट ,अ.नगर | ३ मे. टन | ९८५/- | ९.५०/- |
| | | ४ मे. टन | १०२५/- | ९.९५/- |
| | | १० मे. टन | १३१५/- | १२.२५/- |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी आहे. निविदाधारकास इकडील पत्र क्र. १९४५ दि. १८/२/०९ अन्वये निविदा दराचे वाटाघाटीसाठी दि. २१/२/०९ रोजी चर्चेस अथवा अंतीम दराबाबत लेखी खुलासा करणेचे कळविले असता त्यांनी सदर काम खाली नमुद केलेल्या दराने करणेस तयार असल्याचे कळविले आहे.

**<u>सुधारित दर</u>**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | टॅंकर क्षमता | प्रति दिन भाडे | प्रति कि. मी. दर |
|---|---|---|---|---|
| **१** | **मे.दिपाली ट्रान्सपोर्ट,अ.नगर** | **३ मे. टन** | **६५०/-** | **७.००/-** |
| | | **४ मे. टन** | **६५०/-** | **७.००/-** |
| | | **१० मे. टन** | **१०७५/-** | **९.५०/-** |

दि. २१/२/०९ रोजीच्या छाननी समितीने सदर काम उपरोक्त सुधारित दराने देणेची शिफारस केलेली आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

यास्तव प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच विषय मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे दि. ५/०५/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पाणी वाटप करणे साठी टॅन्कर भाडयाने लावणे करिता आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पंजाबी नि.ज.:- कुणाकुणाचे टेंडर आलेले आहेत.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर मे.गाडे ट्रान्सपोर्ट,अहमदनगर व मे. विक्रांत ट्रान्सपोर्ट अहमदनगर यांचे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यामधील मे. दिपाली ट्रान्सपोर्ट अहमदनगर यांचे सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले आहेत.

मा.श्री. शेख न.अ.र. :- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यात यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे निविदा दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये टंचाईग्रस्त क्षेत्रात सन २००९-२०१० या आर्थिक वर्षीमध्ये टॅन्कर्स द्वारे पाणी पुरवठा करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे कमीचे निविदा दर धारक मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर यांचे

| **टँकर क्षमता** | **प्रति दिन भाडे** | **प्रति कि. मी. दर** |
|---|---|---|
| **३ मे. टन** | **६५०/-** | **७.००/-** |
| **४ मे. टन** | **६५०/-** | **७.००/-** |
| **१० मे. टन** | **१०७५/-** | **९.५०/-** |

कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख नजीर अहमद अ.रज्जाक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर भागासाठी पाणी पुरवठा योजना १५.०० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची उंच टाकी सरंक्षक भिंतीसह बांधणे बाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर भागासाठी नवीन पाण्याची टाकी बांधणे बाबत.

टिप्पणी

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नव्याने समाविष्ट झालेल्या मुकुंदनगर भागामध्ये सध्यस्थितीतील वितरण व्यवस्था व तेथील नागरिकांच्या दैंनदिन पाण्याची बाब विचारात घेउन तेथील भागासाठी स्वंतत्र नवीन पाण्याची टाकी बांधणेच्या प्रस्तावावर सन २००८-२००९ च्या अंदाजपत्रकीय सभेमध्ये ठराव क्र.२ साठी सविस्तर चर्चा होवून मुकुंदनगर भागासाठी १५.०० लाख लिटर्स क्षमतेची नवीन उंच टाकी सरंक्षण भिंतीसह बांधणेचा निर्णय झालेल्या निर्णयाप्रमाणे दि. २७/९/२००८ रोजी व तद्नंतर दिनांक ४/१/२००९ रोजी वर्तमानपत्रात फेरजाहिर निविदा मागविली असता निविदामधील कमीचे प्राप्त दर निविदाधारक मे.एस.एन.एन्टरप्रायजेस, ठाणे यांचे सदर कामासाठी दर सर्वात कमीचे परंतु निविदा अंदाजपत्रकीय रक्क्मेपेक्षा ७१.१० % जास्तीचे प्राप्त झालेले होते. परंतु सदर दराची चालू दरसुचीप्रमाणे तुलना केली असता ते ३१.४५ % जास्तीचे येत असल्यामुळे दि. २०/२/०९ रोजी मे.एस.एन. एन्टरप्रायजेस ठाणे यांचे प्रतिनिधी श्री. कांबळे यांचेशी मा.उपायुक्त (सा), मुख्यलेखाधिकारी व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे समक्ष झालेल्या वाटाघाटीत त्यांनी सदरचे काम सन २००८-२००९ चे दरसुची पेक्षा ४.५ % जास्तीच्या दराने काम करणेस सहमती दर्शविलेली असून म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ४२.३८ % जादा दराने करण्यात येईल असे इकडेस पत्र दिलेले आहे.

निविदा दराबाबत झालेल्या वाटाघाटीनुसार येणा-या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | निविदेची अंदाजे किंमत [ २००७-०८] | रू. ५२,७५,८२३/- |
| २) | वाटाघाटीनंतरचा देकार (४२.३८% जादा) | रू. २२,३५,८९४/- |
| | एकूण | रू. ७५,११,७१७/- |

याप्रमाणे सन२००८-२००९दरसुचीनुसार प्रस्तावीत कामी **एकूण रक्कम रू. ७१,८८,१२४/-** इतका खर्च येणार असून प्राप्त कमीचे निविदाधारक मे.एस.एन. एन्टरप्रायजेस, ठाणे यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या अंदाजपत्रकीय रक्क्मेपेक्षा ४२.३८ % जास्त म्हणजेच रू. ७५,११,७१७/- परंतु सन २००८-२००९ चे दरसुची पेक्षा ४.५ % जास्तीच्या दरास निविदा छाननी समितीची शिफारसी मिळणे साठी सादर प्रस्तावामध्ये मा.आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेब , व मा. मुख्य लेखाधिकारी, यांनी मा. केंद्रशासनाने नगर शहर सुधारीत पाणी पुरवठा योजनेसाठी मंजूर केलेल्या अनुदानात महानगरपालिकेला १०% हिस्सा भरावा लागणार आहे. महानगरपालिका फंडातून जरी सदरचा खर्च होणार असला तरी UIDSSMT अंतर्गत एकूण अनुदानात सदर खर्चाचा समावेश करणेस मंजूरीसाठी सादर प्रस्ताव मा. स्थायी समिती, समोर ठेवणेचे निर्देशित केलेले आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर भागासाठी पाणी पुरवठा योजना १५.०० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची उंच टाकी सरंक्षक भिंतीसह बांधणे बाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मुकुंदनगर भागासाठी पाण्याची टाकी बांधणे कामी आलेले निविदा दरास मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शहर अभियंता यांनी प्रस्तावाचा माहिती सभेस द्यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- मुकुंदनगर भागामध्ये सद्यस्थितीतील वितरण व्यवस्था व तेथील नागरिकांच्या दैनंदिन पाण्याची बाब विचारात घेउन्र तेथील भागासाठी १५ लाख लिटर्स क्षमतेची नवीन उंच टाकी बांधणे बाबत सन २००८-२००९ च्या अंदाजपत्रकीय सभे मध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे वर्तमान पत्रामध्ये ५२,७५,८२३/- किंमतीच्या कामाच्या फेर जाहिर निविदा मागविण्यांत आल्या असता मे.एस.एन. एन्टरप्रायजेस, ठाणे यांच्या अंदाजपत्रकीय रकमे पेक्षा ४२.३८ टक्के जादाचे म्हणजे एकूण रूपये ७५,११,७१७/- किमंतीची कमीची निविदा प्राप्त झालेली आहे. छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे सन २००८-२००९ चे दरसुची पेक्षा ४.५ % जास्तीचे दरास मान्यते साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा. उपायुक्त श्री. हांगे साहेब :- पुर्वी कितीची होती आता काय रकमेची आहे.?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- मूळ निविदा ५२,७५,८२३/- ची होती. छाननी समितीचे शिफारसीनुसार ती रूपये ७५,११,७१७/- या रकमेची आहे व सदरचा खर्च यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गतचे प्राप्त अनुदानात समावेश करणेस मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- पाण्याचे टाकी व्यतिरिक्त काय काय काम घेणार आहात.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :-१५ लाख लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी व सरंक्षण भिंतीचे काम यामध्ये समाविष्ठ आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूर करावा. आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- आलेले कमीचे दरास व सदर कामाचा खर्च यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेअंतर्गतचे प्राप्त अनुदानात समावेश करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर भागासाठी चे सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत १५ लाख लिटर्स क्षमतेची पाण्याची उंच टाकी सरंक्षक भिंतीसह बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे कमीचे निविदा दर धारक मे. एस.एन. एन्टरप्रायजेस, ठाणे यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या सन २००८-२००९ चे दरसुची पेक्षा ४.५%(चार पुर्णांक पांच दशांश टक्के) जादाचे दरास व एकूण रक्कम रूपये ७५,११,७१७/- ( रूपये पंच्याहत्तर लाख आकरा हजार सातशे सतरा फक्त) चे खर्चास तसेच सदर खर्च यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गतचे प्राप्त अनुदानात समावेश करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

| विषय क्रमांक- १६ | मंगळवार दिनांक २८/७/२००९ |
|---|---|
| ठराव क्रमांक - १६ | मंगळवार दिनांक २८/७/२००९ |

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी सन २००९-२०१० साठीचे वार्षिक मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबताचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- अहमदनगर शहरात विविध ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे बाबत.

मा. सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहरात विविध ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणेकामी सन २००९-१० साठीचे वार्षिक निविदा मागविण्यात आली असुन ती मा.स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत उन्हाळयामुळे पाणी टंचाई मोठया प्रमाणत आढळत असल्याने मा. आयुक्त साहेब, यांचे प्रशासकीय मान्यतेने खालील ठिकाणी टँकर्स कार्यरत ठेवणेत आलेली आहेत .

१] केडगांव उपविभाग- १२ टँकर्स
२] सारसनगर उपविभाग- ३ टँकर्स
३] बुरूडगांव उपविभाग- १ टँकर्स
४] नगर कल्याण रस्ता - १ टँकर्स
५] इंदिरानगर, हनुमाननगर- १ टँकर्स
६] शहर / सावेडी विभाग - २ टँकर्स

असे एकुण- २० टँकर्स कार्यरत आहेत.

वर्षभरासाठी उन्हाळयाचे दिवस वगळता खालीलप्रमाणे १० टँकर्स कार्यरत ठेवावे लागतील.

१] केडगांव उपविभाग- २ टँकर्स
२] सारसनगर उपविभाग- ३ टँकर्स
३] बुरूडगांव उपविभाग- १ टँकर्स
४] नगर कल्याण रस्ता - १ टँकर्स
५] इंदिरानगर, हनुमाननगर- १ टँकर्स
६] शहर / सावेडी विभाग - २ टँकर्स

वरील १० पैकी ८ टँकर्स १० मे. टनाचे व २ टँकर्स ४ मे. टनाचे (शहर व केडगांवसाठी) याप्रमाणे कार्यरत ठेवणेस तसेच उन्हाळयाचे काळामध्ये आवश्यकतेनुसार केडगांव व शहर / सावेडी विभागासाठी (१०+२) असे एकुण १२ अतिरिक्त टँकर्स चालु करणेस मा.आयुक्त साहेब यांना अधिकार देणेस व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट मा. स्थायी समितीकडे पाठविणेबाबत मा. आयुक्त यांनी दि. ९/६/०९ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ तसेच मंजुरीस्तव मा. स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता श्री. मगर एन.बी. यांचा अहवाल असे. दि.११/६/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी सन २००९-२०१० साठीचे वार्षिक मागविण्यांत आलेल्या निविदा व याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबताचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- टॅन्करने पाणी पुरवठा करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- शहर अभियंता यांनी प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- अहमदनगर शहरात विविध ठिकाणी पाणी पुरवठा टॅन्कर्सद्वारे करणे कामी सन २००९-१० सालासाठीचे वार्षिक निविदाचे मंजूर दराने वर्ष भरासाठी उन्हाळयाचे दिवस वगळता १) केडगांव उपविभागासाठी २ टॅन्कर्स २) सारसनगर उपविभागासाठी ३ टॅन्कर्स ३) बुरूडगांव उपविभागासाठी १ टॅन्कर्स ४) नगर-कल्याण रस्ता १ टॅन्कर्स ५) इंदिरा नगर हनुमाननगर साठी १ टॅन्कर्स व ६) शहर / सावेडी विभागासाठी २ टॅन्कर्स कार्यरत ठेवणेस. तसेच वरील दहा टॅन्कर्स पैकी ८ टॅन्कर्स १० मे. टन क्षमतेचे व २ टॅन्कर्स ४ मे.टन क्षमतेचे असे १२ अतिरिक्त टॅन्कर्स उन्हाळयाचे काळामध्ये आवश्यकते नुसार केडगांव व शहर / सावेडी विभागासाठी चालू करणेचे अधिकार मा. आयुक्त साहेब यांना देणेस व त्या कामी येणारे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव मा.सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे कामी सन २००९-२०१० साठीचे मंजूर निविदा दरानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये वर्षभरा साठी उन्हाळयाचे दिवस वगळता

१] केडगांव उपविभाग- २ टँकर्स　　२] सारसनगर उपविभाग- ३ टँकर्स

३] बुरूडगांव उपविभाग- १ टँकर्स　　४] नगर कल्याण रस्ता - १ टँकर्स

५] इंदिरानगर, हनुमाननगर- १ टँकर्स　　६] शहर / सावेडी विभाग - २ टँकर्स

यាप्रमाणे आठ टॅन्कर्स दहा मे.टनाचे व दोन टॅन्कर्स चार मे.टनाचे (शहर व केडगांव साठी) या प्रमाणे दहा टँन्कर्स कार्यरत ठेवणेस तसेच उन्हाळयाचे काळामध्ये आवश्यकते नुसार केडगांव व शहर / सावेडी विभागासाठी (दहा + दोन) असे एकूण बारा अतिरिक्त टॅन्कर्स चालु करणेस मा.आयुक्त साहेब यांना अधिकार देणेस व त्याकामी येणारे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक.　　सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.　　सही /-　　सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.　　सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

| विषय क्रमांक- १७ | मंगळवार दिनांक २८/७/२००९ |
|---|---|
| ठराव क्रमांक - १७ | मंगळवार दिनांक २८/७/२००९ |

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथील महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीसाठी.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- राणी लक्ष्मीबाई चौक भुषणनगर केडगांव येथील महिला जिम बाबत..

अहमदनगर महानगरपालिकेचे महापौर विकास निधी अंतर्गत राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगांव येथील महिला जिम साठी रू. ७ लाखाचे व्यायाम साहित्य पुरविण्यांत आलेले असुन मा.सौ. मोहिनी संजय लोंढे, मा.श्री. रविंद्र दगडु कांबळे, मा.श्री. सुनिल सर्जेराव कोतकर, मा.श्री. सुनिल रामदास कोतकर, यांनी इकडेस यादी देवुन सदर जिमसाठी प्रशिक्षीत महिला कोचची नियुक्ती करणे बाबत मागणी केली आहे.

यावर मा.आयुक्त सो., अहमदनगर महानगरपालिका यांनी अहवाल सादर करणेस आदेशित केलेनुसार सादर केलेल्या अहवालावर सदर महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर देणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार सदर महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर द्यावयाची झाल्यास त्यास मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदर प्रकरण मा.स्थायी समितीपुढे पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे क्रीडा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- म.न.पा. हद्दीतील राणी लक्ष्मी बाई चौक भुषणनगर,केडगावं येथील महिला जिम खाजगी करणाचे तत्वावर चालविणेस देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे क्रीडा विभाग प्रमुख श्री. फिलीप्स यांनी ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविला.

मा.श्री. भोसले ग.पु.:- खाजगी तत्वावर जिम चालविण्यांस दिला तर पालिकेचे उत्पन्न वाढेल.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- जिम खाजगी तत्वावर दिल्यास त्याचा मुली व स्त्रिया फायदा घेतील म.न.पा.चे उत्पन्न पहावे.

मा.श्री. कांबळे र.द.:- जिमसाठी महिला कोचची नियुक्ती करावी अगर तो चालविण्यांस द्यावा.

मा.सभापती साहेब :- सदर जिमसाठी किती खर्च केलेला आहे.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- रूपये सात लाख खर्च व्यायाम साहित्यासाठी केलेला आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- क्रिडापटु कु. पुजा वराडे यांचा अर्जुन पुरस्कार मिळलेने म.न.पा.तर्फे सत्कार करणेत यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. महापौर साहेबांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. तो सर्वा तर्फे केल्या सारखे आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- म.न.पा.ने भव्य सत्कार केला तर चांगले दिसेल.

मा.सभापती साहेब :- क्रिडापटु श्री. पंकज शिरसाठ व कु.पुजा वराडे यांना महाराष्ट्र शासनाचा अर्जुन पुरस्कार व कु. केतकी बोकोरे यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळाले बध्दल त्यांचे अभिनंदनाचा ठराव घेणेत यावा.

मा.श्रीमती गंभीर इं. कि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- मंजूर करावा. क्रीडापटुचे अभिनंदनाचा ठराव करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महापौर विकास निधी अंतर्गत राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथे बांधण्यात आलेला महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर चालविण्यास देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

श्री. पंकज शिरसाठ व कु. पुजा वराडे यांना महाराष्ट्र शासनाचा अर्जुन पुरस्कार व कु. केतकी बोकोरे यांना शिवछत्रपती पुरस्कार मिळाले बध्दल त्यांचे अभिनंदन नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्रीमती गंभीर इंदरकौर किशन. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागात मिळकत व्यवस्थापन विभागासाठी मानधना वरील नेमलेल्या तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांना मुदतवाढ देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना,

विषय- अहमदनगर महानगरपालिका, नगररचना विभागातील मानधनावर नेमलेले तज्ञ अधिकारी व भुमापक यांना मुदतवाढ मिळणे बाबत.

संदर्भ :- मानधनावरील तज्ञ अधिकारी व भुमापक यांचा दि.१८/५/०९ रोजीचा अर्ज.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मालमत्ताबाबतची माहिती संकलीत करणे मालमत्तांवर महानगरपालिकेच्या नावांची नोंद करणे, मोजणी करणे. पाठपुरावा करणे इत्यादी साठी खालील तज्ञ अधिकारी व भुमापक यांची सहा महिने कालावधीसाठी मानधनावर नेमणुक करण्यात आलेली होती.

| अ.नं. | तज्ञ अधिकारी व भुमापक यांची नावे | पद |
|---|---|---|
| १ | श्री. सर्जेराव बोल्हाजी शिंदे | सेवा निवृत्त तहसिलदार |
| २ | श्री. मच्छिंद्र काशिनाथ पुंड | सेवा निवृत्त नायब तहसिलदार |
| ३ | श्री. लक्ष्मण नामदेव सावेकर | सेवा निवृत्त भुमापक |
| ४ | श्री. खलील फकिर मंहमद पठाण | सेवा निवृत्त भुमापक |

वरील नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांची मानधनावरील मुदत संपत आलेली आहे परंतु अजुन महानगरपालिकेच्या मालमत्ते बाबत मोठया प्रमाणावरील नोंदीची कामे करणे बाकी असल्याने त्यांना मुदत वाढ देणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मंजुरी करीता सादर करणे योग्य होईल असे मत आहे. पुढील आदेशार्थ सादर.

**सोबत-** मानधनावरील तज्ञ अधिकारी व भुमापक यांनी केलेली कामे व करावयाची राहीलेली बाकी कामे या बाबत तक्ता जोडलेला आहे.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.चे नगररचना विभागात मिळकत व्यावस्थापन विभागासाठी नेमलेल्या तज्ञ अधिकारी भुमापक यांना मुदतवाढ देणे विषयी प्रस्ताव मंजूरीसाठी आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- माहिती सांगावी.

इंजि.श्री. बल्लाळ :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता बाबतची माहिती संकलीत करणे मालमत्तावर महानगर पालिकेच्या नावाची नोंद करणे जागेची मोजणी करणे नांव नोंदणी साठी पाठपुरावा करणे इत्यादी साठी श्री. सर्जेराव बोल्हाजी शिंदे सेवा निवृत्त तहसिलदार, श्री. मच्छिंद्र काशिनाथ पुंड सेवा निवृत्त नायब तहसिलदार, श्री. लक्ष्मण नामदेव सावेकर सेवा निवृत्त भुमापक, व श्री. खलील फकिर महमंद पठाण सेवा निवृत्त भुमापक यांची मानधनावर नेमणूक करण्यांत आली होती. त्यांना मुदत वाढ देणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- यांचे मानधनवरील नेमणूकामुळे म.न.पा.चा फायदा झाला आहे का ?

इंजि.श्री. बल्लाळ :- होय त्यांचे पासून म.न.पा.चा फायदा झालेला आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:-या ही प्रस्तावासोबत जोडलेला तक्ता आम्हास अजेंडयाबरोबर प्राप्त झालेला नाही.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचे मानधनावर नेमलेल्या तज्ञ अधिकारी व भुमापक यांचे दिनांक ३०/६/२००९ अखेर पर्यतचे नेमणूकीस मंजूरी देण्यांत यावी पुढील कामासाठी ठेका देण्यांत यावा. म.न.पा.च्या ब-याच प्रॉपर्टीवर मनपाचे नांव लावलेले नाही पिंपळगाव तलाव व परिसर पर्यटन विकास अंतर्गत ? डेव्हलप करणे आहे. तर तलाव आपले ताब्यात आहे पण त्याचे उता-यावर जागेवर आपले नांवाची नोंद नाही पूर्वी असलेले प्रॉपर्टी व्यावस्थापकाचे पद सध्या असते तर चांगले झाले असते आता महानगरपालिकेने मानधनावर नेमणूका केल्याने महानगरपालिकेचे जागेचो मोजमापे करून सात बाराचे उता-यावर म.न.पा.चे नांव लावणेचे काम यांनी केलेले आहे वेळचे वेळी सिटी सर्व्हे व सात बाराचे उता-यावर नांव न लावल्या मुळे एका प्रॉपर्टी संदर्भात मे. कोर्टात याचिका दाखल झाली होती.

मा.श्री. भोसले ग.पु.:- त्यांचे काम चांगले असले तर त्यांचे नेमणूकीस मुदतवाढ द्यावी.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- महानगरपालिकेचे सर्वच ओपन स्पेस ला कंपाउन्ड करणे आवश्यक आहे. म.न.पा.ची जागी बळकावली जात अशा ठिकाणी अशी कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपल्या प्रॉपर्टीचे रक्षण करणे महानगरपालिकाचे कर्तव्य आहे. त्याकरितांच सदरच्या नेमणूका केल्या होत्या आवश्यकत्या ओपन स्पेस ला कंपाउन्ड केलेले आहे.सर्वच ओपन स्पेसला कंपाउन्ड करणे सध्या तरी शक्य नाही टप्याटप्याने ते करणेत येईल.

मा.श्री. पवार बा.रे. :- महानगरपालिकचे मिळकत व्यावस्थापन विभागाचे काम कंत्राटी पध्दतीने देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज.:- महानगरपालिकाचे प्रॉपर्टीला नांव लावणेचे काम कंत्राटी पध्दतीने निविदा मागवून देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागात मिळकत व्यावस्थापन विभागा कडील तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ३०/६/२००९अखेर मुदतवाढ देणेस मंजूरी देण्यांत यावी तसेच म.न.पा. मिळकती वर म.न.पाचे नांव लावणे कामी तज्ञ अधिका-यांची कंत्राटी पध्दतीने जाहिर निविदा मागवून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> अहमदनगर महानगरपालिकेचे नगररचना विभागात मिळकत व्यावस्थापन विभागासाठी मानधनावर नेमलेल्या तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक ३०/६/२००९ अखेर मुदतवाढ देणेस मंजूरी देण्यांत येते आहे. ऑफिस रिपोर्ट, खर्च मंजूर.

नगर रचना विभाग कडील मिळकत व्यावस्थापन विभागाकडील महानगरपालिकेच मिळकतीवर म.न.पा.चे नांव लावणे कामी तज्ञ अधिका-यांची कंत्राटी पध्दतीने जाहिर निविदा मागवून नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- १९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - १९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९ चे बाबवार जमा-खर्च वार्षिक लेखे, वार्षिक लेख्याचा गोषवारा व मत्ता दायित्वबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- ान २००८-२००९ चे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्याचा गोषवारा व मत्ता दायित्वबाबत.

विनंती टिप्पणी देण्यांत येते की, सन २००८-२००९ चे बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्याचा गोषवारा व मत्ता-दायित्वे मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. तरी सदरचा विषय मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यात यावा, ही विनंती.

**सोबत :-** मा. आयुक्त यांची मंजूर टिप्पणी व सन २००८-०९ चे १) वार्षिक लेखे २) वार्षिक लेख्याचा सारांश व मत्ता- दायित्व.

येणे प्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.
हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे सन २००८-२००९ चे बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे वार्षिक लेख्याचा गोषवारा व मत्ता दायित्वाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव आहे.

मा.श्री. शेख न.अ.र. :- ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००८-२००९ चे बाबवार जमा-खर्चाचे वार्षिक लेखे, वार्षिक लेख्यांचा गोषवारा व मत्ता दायित्वाचे सारांशास मंजूरी देण्यांत येत आहे. अखेर मंजूरीसाठी मा. महानगरपालिका सभे कडेस सादर.

सुचक :- मा.श्री. शेख नजीर अहमद अ. रज्जाक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २० मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २० मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव, मोतीबागनगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व खर्चास मा.स्थायी समिती ठराव नं.८ दि. १५/१२/२००८ अन्वये मंजूरी प्राप्त असुन, दरसुची मध्ये अनवधानाने झालेली चूक दुरूस्त करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीसाठी.

**प्रस्तावाचा मजकूर** :-प्रस्तावना-विषय-प्र. क्र७ मध्ये केडगांव मोतीबागनगर येथे कुस्तीसंकुल बांधणेचे कामाबाबत.

संदर्भ :- मा. स्थायी समिती ठराव नं. ८ दि.१५/१२/२००८

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, प्रभाग क्र. ७ मध्ये केडगाव मोतीबाग नगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व रू.२३,९७,०००/- चे खर्चास मा. स्थायी समिती ठराव नं.४ दि.११/०८/०८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेवून जाहीर निविदा मागविण्यात आली. त्यामध्ये श्री. अनिल कोठारी, अहमदनगर यांचा देकास सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ३५.१५% जादा आलेला आहे. सुधारीत दरसुचीनुसार (सन २००८-०९)नुसार आलेले दर १२.२४% जादा आहे. ठेकेदाराने सुधारीत देकार निविदा रकमेपेक्षा **२५.००%** जादा ने दिला. त्यानुसार चालू दरसुचीशी पृथःकरण केले असता सुधारीत देकारानुसार सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

**सुधारीत तक्ता नं. १**

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | **रू. २९,७६,३०८/-** |
| २ | चालु दरसुची सा.बां. ०७/०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | **रू. २८,६७,१६५/-** |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | **रू. १,०९,१४४/-** |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x१००) / २ | **३.८१ % जादा** |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

**सदर निविदा सन २००८-२००९ दरसूचीच्या तुलनेत ३.८१ % जादा दराची आहे.**

परंतु अनवधानाने वरील रकमेऐवजी खालील रकमांची प्रस्तावना मा. स्थायी समितीकडे मंजूरीस गेली व त्यास मा. स्थायी समिती ठराव नं. ८ दि.१५/१२/२००८ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

**चुकलेला तक्ता नं. २**

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू. १०,८८,०२६/- |
| २ | चालु दरसुची सा.बां. ०७/०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १०,८८,०१३/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. १३/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x१००) / २ | ३.८४ % जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

सदर निविदा सन २००८-२००९ दरसुचीच्या तुलनेत ३.८४ % जादा दराची आहे.

सदर सुधारीत केलेल्या तक्ता नं. १ प्रमाणे दुरूस्ती करणेस्तव रिपोर्ट मा. स्थायी समिती कडे पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२८/१/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये् वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये् झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती द्यावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- केडगांव मोतीबाग नगर येथील कुस्तीसंकुल बांधणेचे कामाबाबत मंजूर ठरावामध्ये झालेली चुक दुरूस्ती बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- चुक म्हणजे काय

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- सदर कामाची सुधारित देकारानुसार येणारी किंमत, अद्यावत किंमत, टक्केवारी बाबत तक्त्याची अनवधानाने झालेली अदल बदली ची म्हणजे सुधारीत देकारानुसार निविदा रक्कम रू.२९,७६,३०८/- ऐवजी रू. १०,८८,०२६/- टक्केवारी ३.८१ % ऐवजी ३.८४ % या प्रमाणे चुकीचा तक्ता दुरूस्ती साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. कांबळे र.द. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार दुरूस्ती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ मध्ये केडगांव, मोतीबागनगर येथे कुस्ती संकुल बांधणेचे कामास व खर्चास मा.स्थायी समिती ठराव नं.८ दि. १५/१२/२००८ अन्वये दिलेल्या मंजूरी चे दरसुची मध्ये अनवधानाने झालेली खालीलप्रमाणे चुकीची दुरूस्ती करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

**चुकलेला तक्ता नं. २**

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू. १०,८८,०२६/- |
| २ | चालु दरसुची सा.बां. ०७/०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू. १०,८८,०१३/- |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. १३/- |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x१००)<br>२ | ३.८४ % जादा |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

**ऐवजी**

**सुधारीत तक्ता नं. १**

| | | |
|---|---|---|
| १ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | **रू. २९,७६,३०८/-** |
| २ | चालु दरसुची सा.बां. ०७/०८ अनुसार कामाची अद्यावत किंमत | **रू. २८,६७,१६५/-** |
| ३ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | **रू. १,०९,१४४/-** |
| ४ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (३ x१००)<br>२ | **३.८१ % जादा** |
| ५ | शेरा / अभिप्राय | खालील प्रमाणे |

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कांबळे रवी दगडु. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २१ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २१ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते दत्त मंदिर ते अचानक वस्ती जवळील पवार घरापर्यत १०० एमएम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मी माता मंदिर ते दत्त मंदिर ते अचानक वस्ती जवळील पवार घरापर्यत १०० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.नगरसेवक श्री. विजय गव्हाळे

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी निधी

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | २९,९५,१८४/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | १,५४,६३२/- |
| इ] एकुण खर्च :- | ३१,४६,८१६/- |
| ई] शिल्लक :- | १८,५०,१८४/- |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत ठिकाणी ६५ एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन मल्हार चौक ते कायनेटीक चौक वरील १५० एमएम पाईप लाईन मधून पाणीपुरवठा होत आहे. सदरची पा.ला.पुढे कायनेटीक कंपनी पर्यत गेलेली असल्याने उपरोक्त भागास पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.

६] प्रस्ताव :- अ] रस्ते लांबी --- मी. रूंदी -- मी.
ब] पा. ला.- लांबी १३५ मी. व्यास-१००एमएम
क] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष --------

७] दरसुची :- म.जि.प्रा. २००८-०९

तरी सदचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय मान्यतेस्तव व खर्चास मंजूरी मिळणेस्तव मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे दि.२३/६/०९
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते दत्त मंदिर ते अचानक वस्ती जवळील पवार घरापर्यत १०० एमएम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ५५ मधील पाईप लाईन टाकणचे कामास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- विषय क्रमांक २१,२२,२३,२४ व २५ या कामांच्या निविदा प्रसिध्द झालेल्या आहेत का ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- नाही या कामाच्या निविदा काढलेल्या नाहीत कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २१ ते २९ हे प्रशासकीय मंजूरी साठी सभेपुढे सादर केलेले आहेत.

शहर अभियंता श्री. मगर एन.जी. :- या कामांच्या निविदा मागविलेल्या नाहीत टेंडर काढलेले नाही कामास व खर्चास मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केलेले आहेत.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- हे कामे झालेली नाहीत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कामे झालेली नाहीत

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- विषय क्रमांक २१ ते २९ या कामांचे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यंत यावे

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २१ ते २९ चे कामांचे प्रस्तावाना सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते दत्त मंदिर ते अचानक वस्ती जवळील पवार घरापर्यत १०० एमएम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,५४,६३२/-(रूपये एक लाख चौपन्न हजार सहाशे बत्तीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील बोहरी चाळ येथे अंबिका निवास ते अंतरे घर ते चेन्नूर घर ते निकाळजे घरापर्यत ८० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्रभाग क्र. ५५ मधील बाहेरी चाळ येथे अंबिका निवास ते अंतरे घर ते चेन्नूर घर ते निकाळजे घरापर्यत ८० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.नगरसेवक श्री. विजय गव्हाळे

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी निधी

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | ३१,४९,८१६/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | १,२५,२१८/- |
| इ] एकुण खर्च :- | ३२,७५,०३४/- |
| ई] शिल्लक :- | १७,२४,९६६/- |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत ठिकाणी जुनी पी.व्ही.सी. पा.ला. अस्तित्वात आहे. पी.व्ही.सी. पाईप लाईन असल्यामुळे वेळोवेळी दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नवीन पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी --- मी. | रूंदी --- मी. | |
| ब] पा. ला.- | लांबी १५० मी. | व्यास-८०एमएम | |

क] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष ---------

७] दरसुची :- म.जि.प्रा. २००८-०९

तरी सदचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय मान्यतेस्तव व खर्चास मंजूरी मिळणेस्तव मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२३/६/०९
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील बोहरी चाळ येथे अंबिका निवास ते अंतरे घर ते चेन्नूर घर ते निकाळजे घरापर्यंत ८० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील बोहरी चाळ येथे अंबिका निवास ते अंतरे घर ते चेन्नूर घर ते निकाळजे घरापर्यंत ८० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,२१८/-(रूपये एक लाख पंचवीस हजार दोनशे आठरा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २९ रेणावीकर कॉलनी ,कुलकर्णी सखी अपार्ट मेंट, जाधव घर ते कोकणे घरापर्यत तसेच गृहशिल्प हौ.सो. व विद्या कॉलनी अंतर्गत रस्त्यावर २५ एमएम जाडीचे ओपन ग्रेडेड कारपेट व लिक्वीड सिलकोट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्रभाग क्र. २९ रेणावीकर कॉलनी कुलकर्णी सखी अपार्टमेंट, जाधव घर ते कोकणे घरापर्यत तसेच गृहशिल्प हौ.सो. व विद्या कॉलनी अंतर्गत रस्त्यावर २५ एमएम जाडीचे ओपन ग्रेडेड कारपेट व लिक्वीड सिलकोट करणे बाबत.

२] प्रभाग क्रमांक :- २९

३] सुचविणा-यांचे नांव :- श्री. शेंडगे संजय छगन

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| | | |
|---|---|---|
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- | सन ०९/१० बजेट रजि नं. पान नं अनं |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. ३६,४४,२८९/- | |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. ६,२६,४४१/- | |
| इ] एकुण खर्च :- | रू. ४२,७०,७३०/- | |
| ई] शिल्लक :- | रू. ७,२९,२७०/- | |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत रस्त्याचे यापुर्वी मागील १० वर्षापुर्वी डांबरीकरण झालेले आहे. तद्नंतर सदर रस्त्याची देखभाल दुरूस्ती करणेत आलेली नाही नळजोड, गटर दुरूस्ती यासाठी झालेल्या खोदाईमुळे रस्ता मोठया प्रमाणात नादुरूस्त झालेला आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | -- | रूंदी | --- |
| ब] पाईप लाईन | लांबी | -- | व्यास | --- |

क] गटर
ड] इमारतीचे क्षेत्रफळ
इ ] इतर
ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष — १० वर्षापेक्षा जास्त

७] दरसुची :- सा.बा.वि. व म.जि.प्रा. २००८-०९

तरी सदचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय मान्यतेस व खर्चास मंजूरी मिळणेस मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२३/६/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २९ रेणावीकर कॉलनी ,कुलकर्णी सखी अपार्ट मेंट, जाधव घर ते कोकणे घरापर्यंत तसेच गृहशिल्प हौ.सो. व विद्या कॉलनी अंतर्गत रस्त्यावर २५ एमएम जाडीचे ओपन ग्रेडेड कारपेट व लिक्वीड सिलकोट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २९ रेणावीकर कॉलनी ,कुलकर्णी सखी अपार्ट मेंट, श्री.जाधव घर ते श्री. कोकणे घरापर्यंत तसेच गृहशिल्प हौ.सो. व विद्या कॉलनी अंतर्गत रस्त्यावर २५ एमएम जाडीचे ओपन ग्रेडेड कारपेट व लिक्वीड सिलकोट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६,२६,४४१/-(रू. सहा लाख सव्वीस हजार चारशे एक्केचाळीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर गावठाण स्लम भागातील श्री. विष्णु पवार घर ते अशोक काळे घर ते भाकरे घरादरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्रभाग क्र. ११ मधील नागापूर गावठाण स्लम भागातील श्री. विष्णू पवार घर ते अशोक काळे घर ते भाकरे घरादरम्यान रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट करणे.

२] प्रभाग क्रमांक :- ११

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. पोपटराव बारस्कर (नगरसेवक) व मा.श्री. अरूण जगताप (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

ब] तरतूद :- रू. ५०,००,०००/-

क] यापुर्वीचा खर्च :- रू. १७,२४,१७९/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. ४,९५,९२१/-

इ] एकुण खर्च :- रू. २२,२०,१००/-

ई] शिल्लक :- रू. २७,७९,९००/-

५] सद्यस्थिती :- रस्ता खराब झालेला असुन नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्याचे सिमेंट कॉक्रीट करणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | १०९ मी. | रूंदी | |
| ब] पाईप लाईन | लांबी | | व्यास | |

क] गटर
ड] इमारतीचे क्षेत्रफळ
इ ] इतर
ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष

७] दरसुची :- सा.बा.वि. २००७-२००८

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर प्रशासकीय मान्यतेस व खर्चास मंजूरी मिळणेस मान्यतेस सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.३०/६/०९
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर गावठाण स्लम भागातील श्री. विष्णु पवार घर ते अशोक काळे घर ते भाकरे घरादरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर गावठाण स्लम भागातील श्री. विष्णु पवार घर ते श्री. अशोक काळे घर ते श्री. भाकरे घरादरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ४,९५,९२१/- (रूपये चार लाख पंच्याण्णव हजार नउत्र्शे एकवीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते संभाजी कॉलनी येथील भोजने घर, धोत्रे घर ते नरसाळे घर व मातृश्री अपार्ट ते घोरपडे १५०,१००,८० व ५० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :-प्रभाग क्र. ५५ मधील लक्षी माता मंदिर ते संभाजी कॉलनी येथील भोजने घर, धोत्रे घर ते नरसाळे घर व मातृश्री अपार्ट ते घोरपडे घरापर्यत १५०,१००,८० व ५० एमएम व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. गव्हाळे विजय (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. ३२,७५,०३४/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. ३,६९,२५५/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. ३६,४४,२८९/- |
| ई] शिल्लक :- | रू. १३,५५,७११/- |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत ठिकाणी ८० व ५०एमएम व्या.जी.आय. पाईप लाईन अस्तित्वात आहे.सदर भागात नव्याने अपार्ट व घरे झाले असल्याने अपुरा पाणी पुरवठा होतो. मा.आयुक्त यांनी प्र.निहाय मा. सदस्य यांचे समवेत घेतलेल्या समन्वय बैठकीमध्ये प्रस्तावाप्रमाणे पा.ला. टाकणे बाबत सुचना केलेल आहे.

६] प्रस्ताव :-

अ] रस्ते लांबी -- रूंदी --

ब] पाईप लाईन लांबी ४५,१२५,१२०,७५ व्यास १५०,१००,८०,५०

क] गटर

ड] इमारतीचे क्षेत्रफळ

इ ] इतर

ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष ---

| | |
|---|---|
| ७] दरसुची :- | म.जि.प्रा. २००८-०९ |
| ८] अंदाजपत्रकीय रक्कम :- | रू. ३,६९,२५५/- |

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.२/७/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते संभाजी कॉलनी येथील भोजने घर, धोत्रे घर ते नरसाळे घर व मातृश्री अपार्ट ते घोरपडे १५०,१००,८० व ५० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते संभाजी कॉलनी येथील श्री.भोजने घर, श्री.धोत्रे घर ते श्री.नरसाळे घर व मातृश्री अपार्ट मेंट ते श्री.घोरपडे घरापर्यत १५०,१००,८० व ५० एमएम व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,६९,२५५/-(रूपये तीन लाख एकोणसत्तर हजार दोनशे पंचावन्न फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मध्ये दौंड रोड, इंदिरानगर येथील विहीरीजवळ आर.सी.सी. भिंत बांधणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय

१] कामाचे नांव :-प्रभाग क्र. ७ मध्ये दौण्ड रोड इंदिरानगर विहीरीजवळ आर सी सी भिंत बांधणे.

२] प्रभाग क्रमांक :- **७**

३] सुचविणा-यांचे नांव :- प्रशासकीय

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

ब] तरतूद :- रू. ५०,००,०००/-

क] यापुर्वीचा खर्च :- रू. ५,७४,७३१/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,७१,२५६/-

इ] एकुण खर्च :- रू. ७,४५,९७८/-

ई] शिल्लक :- रू. ४२,५४,०१३/-

५] सद्यस्थिती :- पावसाळयात नगर-दौंड रोड लगत असलेल्या इंदिरानगर येथील उंच पाण्याची टाकी शेजारील जुनी विहीर पडलेली आहे. पडलेल्या विहीरीशेजारी सद्यस्थितीत सदर ठिकाणी ५०,००० ली. क्षमतेची पाण्याची उंच टाकी असून सदर टाकी व पडलेली विहीर यांचेतील अंतर जवळपास ९-१० मी. अंतर असून सदर जुन्या विहीरीचे बांधकाम पडलेली असून सभोवतालची माती विहीरीत घसराण्यास सुरूवात झालेली आहे. म्हणून सदर टाकी जवळ असलेल्या विहीरी सभोवतालची माती घसरून कुठलाही अनुचीत प्रकार घडू नये व जिवीत व वित्त हानी घडू नये म्हणून सदर काम प्रस्तावीत केले आहे. सदरचा प्रस्ताव पाणी पुरवठा विभाग मार्फत करण्यात आला होता परंतु पाणी पुरवठा विभाग यांचेकडील दि. ३०/१/२००९/९४७ च्या रिपोर्ट नुसार प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत प्रस्तावीत करण्यात आला आहे.

६] प्रस्ताव :- अ] ड्रेनेज व्यास एमएम लांबी-

ब] या पुर्वी सदर ठिकाणी काम झालेचे अंदाजे वर्ष : यापुर्वी सदर ठिकाणी झाले नाही.

७] दरसुची :- सन २००७-०८ सा.बा. वि.

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. १,७१,२५६/-

९] कनिष्ठ अभियंत्याचे नाव :- निंबाळकर एस.आर.

तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.८/७/०९

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मध्ये दौंड रोड, इंदिरानगर येथील विहीरीजवळ आर.सी.सी. भिंत बांधणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ७ मध्ये दौंड रोड, इंदिरानगर येथील विहीरीजवळ आर.सी.सी. भिंत बांधणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,७१,२५६/-(रूपये एक लाख एक्काहत्तर हजार दोनशे छपन्न फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ अचानक वस्ती येथील मधु कुडे घर ते सुद्रीक घर व साठे घर ते ताकवाले घर अंतर्गत भागात ३०० व २०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :- प्र. क्र. ५५ अचानक वस्ती येथील मधु कुडे घर ते सुद्रीक घर व साठे घर ते ताकवाले घर अंतर्गत भागात ३०० व २०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. गव्हाळे विजय (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. २३,७०,२८३/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. ३,३१,९९०/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. २७,०८,२७३/- |
| ई] शिल्लक :- | रू. २२,९७,७२७/- |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत ठिकाणी २०० एमएम व्या.आर.सी.सी. पाईप लाईन अस्तित्वात आहे.सदर पा.ला.मधुन अचानक वस्तीकडील पावसाळयात मोठया प्रमाणात पाणी येते. सदर भाग सखल असल्याने पावसाळयात नागरिकांचे घरामधुन पाण्याचा निचरा लवकर होत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे पा.ला. टाकणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

अ] रस्ते लांबी -- रूंदी --

ब] पाईप लाईन लांबी २२५व्यास ३०० एमएम

क] गटर लांबी ४५ मीटर व्यास २०० एमएम

ड] इमारतीचे क्षेत्रफळ

इ ] इतर

ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष ७-८

| | |
|---|---|
| ७] दरसुची :- | सा.बा.वि. /म.जि.प्रा. २००८-०९ |
| ८] अंदाजपत्रकीय रक्कम :- | रू. ३,३१,९९०/- |

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.४/७/०९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ अचानक वस्ती येथील मधु कुडे घर ते सुद्रीक घर व साठे घर ते ताकवाले घर अंतर्गत भागात ३००व २०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ अचानक वस्ती येथील श्री.मधु कुडे घर ते श्री. सुद्रीक घर व श्री. साठे घर ते श्री.ताकवाले घर अंतर्गत भागात ३००व २०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,३१,९९०/-(रूपये तीन लाख एकतीस हजार नउत्र्शे नव्वद फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २८ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ गुगळे कॉलनी येथील बिडवे घर ते औटी घरापर्यत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :- प्र. क्र. ५५ गुगळे कॉलनी येथील बिडवे घर ते औटी घरापर्यत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. गव्हाळे विजय (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. २७,०२,२७३/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. २,९२,९११/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. २९,९५,१८४/- |
| ई] शिल्लक :- | रू. २०,०४,८१६/- |

५] सद्यस्थिती :- प्रस्तावीत ठिकाणी २०० एमएम व्या.आर.सी.सी. पाईप लाईन अस्तित्वात आहे.सदर पा.ला.मधुन अचानक वस्तीकडील पावसाळयात मोठया प्रमाणात पाणी येते. सदर भाग सखल असल्याने पावसाळयात नागरिकांचे घरामधुन पाण्याचा निचरा लवकर होत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे पा.ला. टाकणे आवश्यक आहे.पा.ला. टाकतांना जुने सिमेंट कॉक्रीट रस्ता मोठया प्रमाणात खराब होणार असल्याने पेव्हींग ब्लॉक बसविणे प्रस्तावीत केले आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | ७५ मीटर | रूंदी ६ मीटर |
| ब] पाईप लाईन | लांबी | | व्यास ३०० एमएम |
| क] गटर | लांबी ७५ मीटर | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | | | |
| इ ] इतर | | | |
| ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | ७-८ | | |

| | |
|---|---|
| ७] दरसुची :- | सा.बा.वि. /म.जि.प्रा. २००८-०९ |
| ८] अंदाजपत्रकीय रक्कम :- | रू. २,९२,९११/- |

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.४/७/०९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ गुगळे कॉलनी येथील बिडवे घर ते औटी घरापर्यत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५५ गुगळे कॉलनी येथील श्री.बिडवे घर ते श्री. औटी घरापर्यत ३०० एमएम व्यासाची आर.सी.सी. पाईप गटर करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,९२,९११/-( रूपये दोन लाख ब्याण्णव हजार नउत्र्शे आकरा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- २९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - २९ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर स्लम भागातील श्री. पोटोळे घर ते भाकरे घर ते गोरे, गायकवाड घर दरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- १] कामाचे नांव :- प्रभाग क्र. ११ मधील नागापुर स्लम भागातील श्री. पाटोळे घर ते भाकरे घर ते गोरे, गायकवाड घर दरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे

२] प्रभाग क्रमांक :- ११

३]सुचविणा-यांचे नांवः- मा.श्री.अरूण काका जगताप(नगरसेवक) व मा.श्री.पोपटराव बारस्कर (नगरसेवक)

४] लेखाशिर्ष :- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी योजना

| | |
|---|---|
| ब] तरतूद :- | रू. ५०,००,०००/- |
| क] यापुर्वीचा खर्च :- | रू. ७,४५,९८७/- |
| ड] प्रस्तावीत खर्च :- | रू. ९,७८,१९२/- |
| इ] एकुण खर्च :- | रू. १७,२४,१७९/- |
| ई] शिल्लक :- | रू. ३२,७५,८२१/- |

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी रस्ता खराब असुन नागरिकांच्या सोयीसाठी रस्त्याचे नवीन सिमेंट कॉक्रीट करणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी | २१५ मीटर | रूंदी | मीटर |
| ब] पाईप लाईन | लांबी | | व्यास | एमएम |
| क] गटर | | | | |
| ड] इमारतीचे क्षेत्रफळ | | | | |
| इ ] इतर | | | | |
| ई ] या पूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | | | | |

| | |
|---|---|
| ७] दरसुची :- | सा.बा.वि. २००८-०९ |
| ८] अंदाजपत्रकीय रक्कम :- | रू. ९,७८,१९२/- |

सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी संमती दिलेली आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. यास्तव सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती कडे ठेवणे करिता सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.१७/७/०९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर स्लम भागातील श्री. पोटोळे घर ते भाकरे घर ते गोरे, गायकवाड घर दरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणे कामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ मधील नागापुर स्लम भागातील श्री. पोटोळे घर ते श्री. भाकरे घर ते श्री. गोरे, श्री.गायकवाड घर दरम्यान रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९,७८,१९२/-(रूपये नउ लाख अठ्ठयाहत्तर हजार एकशे ब्याण्णव फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३० मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३० मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पाणी पुरवठा करणे करीता कष्टकरी महिला संघ या संस्थेचा ट्रॅक्टर टॅंकर भाडेकराराने व मागणी केलेल्या दराप्रमाणे चालू करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :-प्रस्तावना-विषय- कष्टकरी महिला संघाच्या पाणी पुरवठा करण्याकरीता महानगरपालिके कडे कराराने घेण्यात आलेल्या ट्रॅक्टर.

संदर्भ :- १] अध्यक्ष, कष्टकरी महिला संघ, अ.नगर यांचा दि. ३१/१/०८ चा अर्ज.
२] अध्यक्ष, कष्टकरी महिला संघ, अ.नगर यांचा दि. १०/४/०७ चा अर्ज.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर शहरातील नागरिक लग्न समारंभासाठी व अन्य कारणासाठी महानगरपालिके कडे पाणी विकत देणे बाबत मागणी करतात, तसेच वेळी अवेळी ज्या भागात पाणी टंचाई निर्माण होईल, अशा भागात वरिष्ठांचे पुर्व परवानगीने पाणी वाटप करावे लागते. या कारणास्तव महानगरपालिकेने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत कष्टकरी महिला संघ, रामवाडी, अ.नगर यांचा ५००० लि. क्षमतेचा ट्रॅक्टर टॅंकर प्रती दिन भाडे रू. ५३७.५०/- व प्रती कि.मी. साठी रू. ४.८९% या दराने दि. २५/८/०४ पासून भाडेतत्वावर लावणेस दि.१९/३/०४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली. सदर ट्रॅक्टर टॅंकर युनायटेड वेस्टर्न बॅंक लि., माळीवाडा शाखा, अ.नगर (सद्याची आय.डी.बी.आय.बॅंक) यांचे मार्फत कष्टकरी महिला संघाने खरेदी केली आहे. सदर ट्रॅक्टर टॅंकर कर्जफेड होई पर्यत महानगरपालिके कडे भाडे तत्वावर लावणे कामी महानगरपालिकेने सदर बॅंकेस हमी दिलेली आहे.

सदर ट्रॅक्टर टॅंकर महानगरपालिकेकडे दि .२५/८/०४ पासून दि.१९/२/०७ पर्यत कार्यरत होता, तद्नंतर आजतागायत सदर ट्रॅक्टर टॅंकर महानगरपालिकेकडे पाणी वाटपासाठी उपलब्ध झालेला नाही. या बाबत इकडील जा.क्र. बांधकाम ५५ दि.११/४/०७ अन्वये महानगरपालिकेच्या सुवर्ण जयंती रोजगार विभागास कळवुन ट्रॅक्टर टॅंकर पाणी वाटपासाठी त्वरीत उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे. परंतु आजपावेती सदर ट्रॅक्टर टॅंकर्स वाटपासाठी उपलब्ध झालेला नाही. असे असुनही सदर संस्थेने उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आजपर्यतचे भाडे देण्याची मागणी केली आहे. या बाबत सविस्तर खुलासा की,

सदर ट्रॅक्टर टॅंकरने दररोज ५ ते ६ खेपा केल्यास एक संपुर्ण दिवसाचे भाडे देणे योग्य आहे व त्या प्रमाणेच यांना भाडे अदा केलेले आहे, पंरतु सदर ट्रॅक्टर टॅंकरने एखादे दिवशी खेपा न केल्यास व दुरूस्ती अभावी बंद असल्यास अशा दिवसाचे भाडे देता येत नाही. तसेच एखादे दिवशी २/३ खेपा केल्यास अर्ध्या दिवसाचे भाडे व झालेला कि.मी. प्रमाणे रक्कम अदा करण्यात येते. त्यामुळे सदर ट्रॅक्टर टॅंकरने केलेल्या कामानुसारच देयक तयार करण्यात आले पर्यायाने प्रत्येक महिन्याचे देयकामध्ये कमी अधिक रकमेचा बदल दिसून येतो. सदर संस्थेस यापूर्वी त्यांना अदा केलेले देयक योग्य आहे. तसेच दि.२०/२/०७ पासून आजअखेर ट्रॅक्टर टॅंकर पाणी वाटपासाठी उपलब्ध न झाल्याने सदर कालावधीचे भाडे देता येणार नाही.

सदर संस्थेने उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार ट्रॅक्टर टँकर चालू करणे बाबत कळविले आहे. तसेच पुर्वीच्या असलेला डिझेल दर (ऑगस्ट ०४) व सध्याच्या डिझेलच्या दरामध्ये फार तफावत असल्याने डिझेलचा प्रती कि.मी. वाढवून देणेची मागणी केली आहे. माहे ऑगस्ट ०४ मध्ये डिझेला प्रती मिटर दर रू. २६.१९/- असा होता व सध्याचा दर प्रती लिटर रू. ३५.६९/- असा आहे. म्हणजेच प्रती लिटर दरामध्ये रू. ९.५०/- इतकी दर वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रती कि.मी. रू.४.८९/- चे मंजूर दराऐवजी रू. ६.०८/- असा प्रती कि.मी. दरास मान्यता देणे योग्य वाटते. सदर संस्थेने सदर टँक्टर बंद न ठेवता पाणी वाटपासाठी उपलब्ध करून दिल्यास दररोज जास्तीत जास्त खेपा केल्यास केलेल्या खेपानुसार (५ ते ६ खेपा दररोज केल्यास) दैनंदिन भाडे व कि.मी. प्रमाणे देयक अदा करता येईल. त्यामुळे बँकेचा हप्ता प्रती महा जावू शकेल.

तरी प्रती दिन भाडे रू. ५३७.५०/- व प्रती कि.मी. रू.६.०८/- या मंजुर दराने कर्जफेड होईपर्यत ट्रॅक्टर टँकर चालु करणेस मंजूरीस्तव मा. स्थायी समिती समोर ठेवणेस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि. २३/६/०९.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखावा.

त्याप्रमाणे शहर अभियंता श्री. मगर एन.बी. यांनी कार्यालयीन प्रस्ताव सभे मध्ये वाचून दाखविला.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- सदराचा ट्रॅक्टर टॅन्कर चालू आहे का ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- बंद आहे चालू करणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पु.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार प्रतीदिन भाडे रू. ५३७.५०/- व प्रती कि.मी रू. ६.०८/- या मंजूर दराने कर्जफेड होई पर्यत सदर ट्रॅक्टर टॅन्कर पाणी पुरवठयासाठी चालू करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- त्या प्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत पाणी पुरवठा करणे करीता कष्टकरी महिला संघ या संस्थेचा ट्रॅक्टर टँकर प्रती दिन भाडे रू.५३७.५०/- (रूपये पाचशे सद्‌वतीस पैसे पन्नास फक्त) व प्रती कि.मी. रू. ६.०८/- (रूपये सहा पैसे आठ फक्त) या दराने कर्जफेड होई पर्यत चालू करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३१ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३१ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेकामी समिती गठीत करणे किंवा इतर महानगरपालिकेतील बससेवेचा अभ्यासपुर्ण विचार करून मा.स्थायी समिती कडून मंजूर करून बससेवा सुरू करावी किंवा कसे याबाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना- विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता आलेल्या गोपनिय प्रस्तांवर निर्णय घेणेकामी प्रस्ताव मा. स्थायी समितीचे निर्णयार्थ सादर.

टिप्पणीः

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेने बी.ओ.टी. तत्वावर सुरू केलेला शहर बस सेवा उपक्रम हा तत्कालीन अभिकर्ता संस्था अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्था अहमदनगर यांचे अकार्यक्षमतेमुळे तसेच काही त्रुटीमुळे तो बंद पडलेला आहे. शहर बस सेवा सुरू करणे बाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. १५ दि.१५/१२/०८ अन्वये पारीत ठरावानुसार दि.२५/१२/०८ रोजीचे दै. सकाळ मध्ये जाहिर फेरनिविदा प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता दि.६/१/०९ रोजीच्या निविदा स्विकृती मध्ये वेळेत व मुदतीत खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) अहमदनगर प्रवासी व माल वाहतुक संस्था मर्या.
२) लोककार्य व लोकक्रांती दल महाराष्ट्र राज्य, अहमदनगर
३) सोलापूर महानगरपालिका परिवहन मंडळ, सोलापूर.

दि. ६/११/०९ रोजी वेळेत व मुदतीत प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे उघडले असता तीनही संस्थाचे कागदपत्रांमध्ये अपुर्तता आढल्याने त्यांना पाणी पुरवठा जा.क्र. ८७४ दि.६/१/०९ च्या पत्रान्वये दि.१२/१/०९ अखेर दु. २.०० वाजेपर्यत कागदपत्रांचे पुर्तते बाबत कळविण्यांत आले असता संबंधीत संस्थानी खालील प्रमाणे पुर्तता वेळेत व मुदतीत केली.

१) अहमदनगर प्रवासी व माल वाहतूक संस्था यांनी १,६४,९८,७८३/- चा ताळेबंद व अनुभवा विषयी महानगरपालिकेस दि.१२/१/०९ रोजी दिलेल्या दाखला मिळणेविषयीच्या अर्जाची प्रत सादर केली परंतु त्यांचा ताळेबंद २ कोटी रू. पर्यतचा नाही व अनुभव दाखलाही सादर केला नाही.
२) सोलापूर महानगरपालिकेने निविदेसोबत बयाणा भरलेली नव्हती तसेच बयाणा सुट असल्याबाबतचे कागदपत्रेही सादर केलेले नव्हते.
३) लोककार्य व लोकक्रांतीदल महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांनी ताळेबंद २.०० कोटी पर्यतचा नसून त्यांनी अनुभव दाखलही सादर केलेला नाही.

सदर बाबत मा. मुख्यलेखाधिकारी यांनी निविदा अटी शर्तीप्रमाणे ताळेबंद सादर न करणे, अनुभवाचा दाखला नसणे तसेच निविदेसोबत बयाणा रक्कम न भरणे तसेच इत्यादी त्रुटी आढळून येतात त्यामुळे निविदा न उघडता रद्द करून अल्पमुदतीची किमान ८ दिवसांची फेर निविदा मागविणे योग्य राहिल असा अभिप्राय दिला होता त्यास मा. उपायुक्त (कर) व मा. आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिल्याने पुन्हा नव्याने फेरनिविदा चौथी दि.२१/१/०९ चे दैनिक सकाळमध्ये प्रसिध्द करून दि.२१/१/०९ ते २८/१/०९ अखेर फॉर्म विक्रीची मुदत ठेवली असता वेळेत व मुदतीत एकच फॉर्म विक्री होवून दि.२९/१/०९ रोजी दु.२.०० वाजेपर्यत निविदा स्विकृती ठेवली असता वेळेत व मुदतीत १ सोलापूर महानगरपालिका परिवहन यांची एकच निविदा प्राप्त झाली निविदा समक्ष उघडणे बाबत शासन निर्णय दि.२/१/९२ मधील एखाद्या निविदेतून कमी प्रतिसाद

मिळाल्यास निविदा चौकशीला दोन वेळा मुदतवाढ द्यावी असे आदेश आहेत परंतु असे न करता उपलब्ध निविदेतून पुरवठादाराची निवड करता येते याआधारे प्रस्ताव ठेवला असता मा. उपायुक्त (कर) यांनी पी डब्लु डी मॅन्यूअल मधील क्र. २०८ चे मुद्यामधील टीप ९.३ नुसार जाहिर निविदेस पुरेशा प्रतिसाद न मिळाल्यास वाटाघाटीने गोपनीय स्वारस्य प्रस्ताव मागविण्यात याव्येत असा अभिप्राय दिला होता त्याप्रमाणे

१) सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम, सोलापूर
२) लोककार्य व लोकक्रांतीदल महाराष्ट्र राज्य, अहमदनगर
३) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन,अ.नगर.
४) प्रसन्ना ट्रॅव्हल्स, प्रा.लि. पुणे यांचेकडून स्वांतत्र्यकरिता गोपनिय प्रस्ताव मागविण्यांत योवत असे आदेशित केले.

मा.उपायुक्त साहेब यांचे आदेशान्वये पाणी पुरवठा जा.क्र. अनु. १७७ ते १८९ दि.२०/५/०९ चे गोपनिय पत्रान्वये वरील संस्थाकडून दि.२७/५/०९ पर्यत दुपारी २.०० वाजेपर्यत स्वंतत्ररित्या गोपनिय अहवाल खालील अटी शर्ती प्रमाणे मागविण्यांत आले.

१) सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेमधील किमान ३ वर्षाचा अनुभव
२) वाहतूक संस्था / कंपनीला रजिस्टर फर्म/ पार्टनरशीप फर्मचा दाखला
३) वाहतूक संस्थेची / कंपनीची वार्षिक उलाढाल किमान २.०० कोटी रू. पर्यतचा ताळेबंद
४) मागील तीन वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल
५) शहर बस वाहतूक खाजगी तत्वावर चालवणे बाबतची स्वारक्ष कल्पना वरीलपैकी मागविलेले गोपनीय अहवाल वेळेत व मुदतीत खालील तीन संस्थानी सादर केले.

१) लोककार्य व लोकक्रांती दल, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर
२) सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम, सोलापूर
३) प्रसन्ना ट्रॅव्हल्स, पुणे

वरील प्राप्त अहवालांचे अवलोकन खालीलप्रमाणे.

**अ)**

१) लोककार्य लोकक्रांतीदल, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर या संस्थेची स्थापना दि.१४/१/०७ रोजी झालेली आहे.
२) ३ वर्षाचा कामाचा अनुभव दिसत नाही.
३) आर्थिक उलाढाल २.०० कोटी रू. पर्यतची नाही.
४) खात्यामध्ये सुरूवातीला फक्त प्रायोजित तत्वावर ५ बसेसद्वारे मर्यादीत सेवा देणे बाबत प्रस्तावीत केले आहे.
५) लोककार्य आणि लोकक्रांती दल यांचे लेखापरिक्षण आहे परंतु निविदाधारकाचे लेखापरिक्षण आढळून येत नाही.

**ब )**

१) सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांचे वार्षिक ताळेबंदाद्वारे उलाढाल २ कोटी पेक्षा जादा असल्याने आढ येत नाहीत.
२) कामाचा अनुभव ३ वर्षापेक्षा जास्त आहे.
३) स्वारस्स मध्ये सध्याच्या १५ बसेस दुरूस्त करून बँकेचे समन २० हप्त्यात कर्जफेडी बाबत कार्यवाही बाबत मान्यता दिली आहे. प्रायोगीक तत्वावर ६ महिन्यासाठी सुरूवात करणे विषयी कळविले आहे.

**क)**

१) प्रसन्ना बस लिक्र्स प्रा.लि. नोंदणी प्रमाणपत्र दि.३०/४/०७

२) ऑनलाईन बस लिक्स प्रा.लि. नोंदणी प्रमाणपत्र २००७-२००८ दिसून येते.

३) प्रसन्ना एंटरप्रायजेसचे ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल आहे.

४) आर्थिक उलाढाल प्रसन्ना एंटरप्रायझेस सन २००५ते २००८ सरासरी २.०० कोटी पेक्षा जास्त आहे.

५) ऑनलाईन बस लिक्स प्रा.लि. सन २००७-२००८ उलाढाल २.०० कोटी पेक्षा कमी आहे.

६) प्रसन्ना एंटरप्रायझेस अनुभव दिसून येतो.

७) स्वारस्स मध्ये

i ) स्वामीत्व धन [ रॉयल्टी] प्रतिबस पतीवर्ष रू. १००१/- नमुद केले आहे.

ii ) करारनामा कालावधी १० वर्षापर्यत नमुद केला आहे.

iii ) प्रवासी भाडे दर नियमानुसार राहिल. परंतु शासन नियमाप्रमाणे सवलती देणे असल्यास महानगरपालिकेने आर्थिक भार उचलला पाहिजे असे नमूद केले आहे.

iv ) जाहिरात करात सूट

v) दंगल संप काळात महानगरपालिकेने पोलीस संरक्षण संपूर्ण खर्चासह पुरवावे असे नमूद केले आहे.

vi ) वाहनतळासाठी महानगरपालिकेने जागा पुरवागी कंपनी सुविधा पुरवेल महानगरपालिकेस एकूण उत्पन्नाचा १०% सदर ठिकाणचा हिस्सा अदा करेल प्रस्ताव सादर करणारी संस्था व कागदपत्रे यांना भिन्नता आढळून येते.

वरील प्रस्तावांबाबत मा. उपायुक्त (कर) यांनी तीनही निविदाचा प्रस्तावाचा एकूण अभ्यास केला असता तीन्हीमध्ये ब-याच प्रमाणात भिन्नता आढळून येते. सबब प्रस्तावा बाबतच सविस्तर छाननीसाठी समिती नेमून सदरचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करावा की फेरनिविदा मा. स्थायी समितीच्या मंजूरीने प्रसिध्द करावी. याबाबत प्रशासकीय मंजूरीस्तव अभिप्राय दिला होता.

मा. आयुक्त साहेब यांनी याबाबत प्राप्त झालेल्या अटी /शर्ती भिन्न असून झालेल्या प्रस्तावांमध्ये महानगरपालिकेवर मोठा आर्थिक अधिभार पडणार आहे.

प्रस्तावामध्ये नमूद अटी / शर्ती बाबत अन्य बससेवा चालविणा-या महानगरपालिकेच्या अभ्यास करून त्यांच्या अटी शर्ती स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेने निश्चित करून बससेवा सुरू करण्याबाबत अभ्यासपुर्वक कार्यवाही करणे योग्य राहिल. सबब प्रस्ताव स्थायी समितीच्या निर्णयार्थ सादर असा प्रशासकीय मंजूरीचा आदेश दिला आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सविनय सादर.

**मा.सादर ,**

अहमदनगर महानगरपालिकेने शहर बससेवा नव्याने सुरू करणे संदर्भात प्रस्ताव मागविले होते. बससेवेकरिता सोलापूर महानगरपालिका परिवहन सेवा, प्रसन्ना ट्रॅव्हल्स प्रा.लि. व लोककार्य स्वंयरोजगार सह. संस्था मर्यादीत यांचे प्रस्ताव प्राप्त होवून त्यावर सविस्तर टिप्पणी देण्यात आली असता, सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणे विषयी आदेशानुसार प्रस्ताव स्थायी समितीकडे देण्यात आला आहे. लोककार्य स्वयंरोजगार सह. संस्थेने शहर बस सेवा चालविणे बाबत शासन निर्णय नगर विकास विभाग, पत्र क्र. बेरोसे-१०/२००२/प्र.क्र. ११०/नवि-२७ मंत्रालय, मुंबई, दि. २३ ऑक्टो. २००२ चे परिपत्रक, राज्यमंत्री,नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.७/७/०९ चे पत्र क्र. रास/नवि पदुम/वि.प.न्या./जनरल /३०३५/२००९ अन्वये कार्यवाही करावी अन्यथा शासन स्तरावर /मा.उच्च न्यायालय स्तरावर कार्यवाही करण्यात येईल तसेच प्रस्तावातील अभिप्रायात बदल करून स्थायी समितीपुढे शासन निर्णयाचा संदर्भासह ठेवणे बाबत कळविले आहे.

तरी नव्याने शहर बस सेवा सुरू करणे कामी आलेल्या प्रस्तावाबाबत संदर्भिय पत्रान्वये पुढील कार्यवाही करणे कामी मार्गदर्शन होणेकामी रिपोर्ट आदेशार्थ सादर केलेला आहे.

शहर बस वाहतुक उपक्रम पुन्हा नव्याने चालू करणेची कार्यवाही चालू असुन, याबाबतीतील निविदा तसेच आलेले Praposals यावर निर्णय घेणेकामी सविस्तर अहवाल मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात आलेला आहेच.

चेअरमन लोककार्य स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादीत यांचे संदर्भीय पत्र सोबत जोडलेले असुन याबाबतची मा.स्थायी समिती यांचे निदर्शनास आणणे क्रमप्राप्त आहे करिता मा.स्थायी समिती यांचे निदर्शनास आणून त्यावर पुढील योग्य तो निर्णय मिळणेस मा.स्थायी समितीचे निर्णयास्तव सादर करणे योग्य आदेशार्थ सादर.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता आलेल्या गोपनीथ प्रस्तावावर निर्णय घेणे कामी प्रस्ताव सादर केला असतात लोककार्य स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित यांनी मा. शासनाने परिपत्रकान्वये निर्णय घेणे बाबत कळविलेले आहे. याचा विचार करून मा.सभेने निर्णय घ्यावा.

येणे प्रमाणे मो.व्हे. विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविला.

मा.सभापती साहेब :- नागरिकांची बससेवा सुरू करणेबाबत मागणी आहे. महानगरपालिका हद्दीत बस सेवा सुरू करणे चांगले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे कामी , मा.सदस्यांची एक समिती स्थापन करू. बसेसेवेबाबत समितीने अभ्यास करून निणर्य घ्यावा असे ठरवू.

मा.श्री. भोसले ग.पु.:- समिती स्थापन कशासाठी करता ?

मा.श्री. लोंढे शि.बा.:- नागरिकांचा प्रश्ना आहे महानगरपालिकामार्फत देण्यांत देत असलेल्या सेवा सुलभ व्हाव्यात.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती द्यावी.

मॅके.इंजि. श्री.निकम पी.जे. :-अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता आलेल्या गोपनीथ प्रस्तावावर निर्णय घेणे कामी प्रस्ताव सादर केला असतात लोककार्य स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित यांनी मा. शासनाने परिपत्रकान्वये निर्णय घेणे बाबत कळविलेले आहे. याचा विचार करून मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्यांचे काय मत आहे

इंजि.श्री. निकम पी.जे. :- संस्थेचे म्हणने आमचे संस्थेस शहर बस वाहतुकीचे काम देण्यांत यावे.

मा.श्री. पवार बा.रे.:- परिपत्रकानुसार हे योग्य आहे का?

मा.सभापती साहेब :- त्यासाठीच समितीची स्थापना करणे आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- सदर प्रकरणी सविस्तर चर्चा करणेत यावी.

मा.श्री. पवार बा.रे.:- मा. महापौर, मा.सभापती व सर्व पक्षिय सदस्य यांची नउ्र जणांची समिती स्थापन करावी त्यांनी सदर प्रकरणी अभ्यास करून निर्णय घ्यावा.

मा.श्री. भोसले ग.पु.:- त्या बाबत मा.सभापती साहेब यांना अधिकार देण्यांत यावेत.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- सदर समितीमध्ये अभ्यासु सदस्यांना घेण्यात यावे.

मा.श्री.पवार द.ज. :- मा. महापौर व मा. सभापती स्थायी समिती यांचे अध्यक्षेतखाली स्थायी समितीचे सर्व पक्षीय सदस्य यांची बस सेवा सुरू करणे कामी निर्णय घेणे करिता अभ्यास समिती स्थापन करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने बससेवा सुरू करणे कामी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे कामी मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका व मा.सभापती स्थायी समिती यांचे अध्यक्षतेखाली मा.श्रीमती शिला अनिल शिंदे, मा.श्री. नितिन शिवाजी शेलार, मा.श्री. दगडु जयवंत पवार, मा.श्री. विजय नाना गव्हाळे, मा.श्री.बाळासाहेब रेवजी पवार, मा.श्री. गणेश पुंडलिक भोसले व मा.श्री. पोपट जगन्नाथ बारस्कर स्थायी समिती सदस्य यांची अभ्यास समिती स्थापन करणेस व समितीने बस सेवा चालविलेल्या महानगरपालिकाचा अभ्यास करून अटी शर्ती ठरवून प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर अभ्यास पूर्ण कार्यवाही करून निर्णय घेउन्न बस सेवा सुरू करणे बाबत कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत नव्याने शहर बस सेवा सुरू करणे करिता प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेकामी मा. महापौर, अहमदनगर महानगरपालिका व मा.सभापती ,स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सदस्य

१] मा.श्रीमती शिंदे शिला अनिल
२] मा.श्री. शेलार नितिन शिवाजी
३] मा.श्री. पवार दगडु जयवंत
४] मा.श्री. गव्हाळे विजय नाना
५] मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी
६] मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक
७] मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ

यांची अभ्यास समिती स्थापन करणेस व समितीने बस सेवा चालविलेल्या महानगरपालिकांचा अभ्यास करून अटी व शर्ती ठरवून प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर अभ्यास पुर्व कार्यवाही करून निर्णय घेउन्न बस सेवा सुरू करणे बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३२ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ, उद्यान बिगारी , यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)ग नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- विषय- आरोपीत कर्मचारी श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ, उदयान बिगारी, यांचे वरील खातेनिहाय चौकशीचा अहवाल.

सादर,

आरोपीत कर्मचारी श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ, उदयान बिगारी, यांचेविरूध्द आस्थापना आदेश २७६७ दि. १६/८/२००८ अन्वये आरोपपत्र क्र. १०५ दि. २१/८/०६ चे देण्यात आले होते. सदरचे आरोपपत्र आरोपीत कर्मचारी हया दि. ९/६/२००४ पासून गैरहजर असल्यामुळे करण्यात आलेल्या चौकशीच्या अंतीम आदेशाप्रमाणे कार्यालयात हजर न झाल्याबाबत देण्यात आले होते.

चौकशी कामी नेमलेल्या विविध तारखांना आरोपीत कर्मचारी हया गैरहजर राहिल्याने त्यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीची वारंवार संधी देउनही त्या अनुपस्थित राहिल्याने त्यांचेविरूध्दचे आरोप शाबीन झाले. सदर अहवालावर मा.आयुक्त साो. यांनी आरोपीत कर्मचा-यास मनपासेवेतून मा.स्थायी समितीच्या पुर्वसंमतीने सेवेतून मुक्त करणेबाबत आदेश दिले सदरच्या आदेशानुसार आरोपीत कर्मचारी श्रीमती गुंजाळ यांना जा.नं. कामगार २१७६ दि. १६/९/०८ अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली असता सदर नोटीशीस देखील त्यांनी उत्तर दिलेले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम५६(२)ग नुसार मनपा सेवेतून श्रीमती गुंजाळ यांना काढून टाकणे कामी मा.स्थायी समितीची पुर्व मंजूरी आवश्यक असल्याने आदेशार्थ.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

सहा. आयुक्त श्री. देशमुख आर.ए.:- आजचे सभेचे अजेंडया वरील प्रस्ताव क्रमांक ३२,३३ व ३४ हे प्रस्ताव एक सारखे असुन श्रीमती वैजयंता माधव गुजांळ, उद्यान विभाग बिगारी हया दिनांक ९/६/२००४ पासून गैरहजर आहेत. श्रीमती वैशाली नाथा जाधव,सफाई कामगार हया दिनांक २०/२/२००८ पासून गैरहजर असून त्यांची या पूर्वी १५९१ दिवस बिनपगारी आहे. तसेच श्री. बाबासाहेब अशोक घोरपडे, सफाई कामगार हे दिनांक २५/२/२००८पासून कामावर गैरहजर असल्याने त्यांना आरोप पत्र देण्यांत आले असता ते खाते निहाय चौकशी कामी हजर राहिले नाहीत अथवा त्यांनी इकडेस संपर्क साधलेला नाही या वरून त्यांना नोकरीची आवश्यकता नाही हे सिध्द होते. त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकण्यांत येत आहे अशी कारणे दाखवा नोटीस दिली असता श्रीमती गुंजाळ यांनी उत्तर दिलेले नाही व श्रीमती जाधव व श्री घोरपडे यांनी केलेला खुलासा असमाधान कारण असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव सादर केलेले आहेत.

मा.श्री. शेंडगे सं.छ.:- सदर कर्मचारी उपस्थित असल्याने त्यांना सभे समोर बोलविण्यांत यावे. त्यांना एक संधी द्यावी.

मा.श्री. लोंढे. शि.बा.:- श्रीमती गुंजाळ यांना सभे मध्ये बोलवावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. सभे पुढे प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला आहे. हे कर्मचारी पांच पांच वर्षे कामावर येत नाहीत. गैरहजर रहातात काम न करणा-यावर कार्यवाही करणे विषयी आम्हाला सांगितले जाते हे गैरहजर आहेत त्यांना कामाची आवश्यकता नाही त्यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजुरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पा.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार हया तीन ही कर्मचा-यांना कामावरून काढून टाकावे.

मा.श्री. पवार द.ज. -:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ , श्रीमती वैशाली नाथा जाधव, व श्री. बाळासाहेब अशोक घोरपडे, यांना म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे या प्रमाणे शिक्षा करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

<u>**ठराव :-**</u> श्रीमती वैजयंता माधव गुंजाळ, उद्यान बिगारी , यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)ग नुसार महानगरपालिका सेवेतुन काढून टाकणे या प्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३३ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** श्रीमती वैशाली नाथा जाधव, सफाई कामगार,यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना- आरोपपत्र क्र.७६८ दि.४/८/०८ चे निर्णयाबाबत

आरोपीत कर्मचारी श्रीमती वैशाली नाथा जाधव, सफाई कामगार यांना गैरहजेरीच्या कारणावरून आरोपपत्र क्र.७६८ दि.४/८/०८ चे देण्यात आले होते. सदर आरोपपत्राचे खातेनिहाय चौकशी अंती आरोप शाबीन झाल्यानंतर त्यांना जा.नं. कामगार ४२८६ दिनांक ६/२/२००९ अन्वये तुम्हास मा. स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्यात येत आहे. अशी शिक्षा का करण्यात येउ नये ? याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली असता सदर नोटीशीस त्यांनी दिलेला खुलासा असमाधान कारक असल्याने त्यांना प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा कायम करणे कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) (अ) अन्वये मा. स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असल्याने प्रकरण निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** श्रीमती वैशाली नाथा जाधव, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)ग नुसार महानगरपालिका सेवेतुन काढून टाकणे या प्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३४ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. बाबासाहेब अशोक घोरपडे, सफाई कामगार, यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना- आरोपपत्र क्र.१३२७ दि.५/११/०८ चे निर्णयाबाबत

आरोपीत कर्मचारी श्री. बाबासाहेब अशोक घोरपडे, सफाई कामगार, यांना गैरहजेरीच्या कारणावरून आरोपपत्र क्र.१३२७ दि.५/११/०८ चे देण्यात आले होते. सदर आरोपपत्राचे खातेनिहाय चौकशी अंती त्यांचे वरील आरोप शाबीन झाल्यानंतर त्यांना जा.नं. कामगार ४२८५ दिनांक ६/२/२००९ अन्वये तुम्हास मा. स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्यात येत आहे. अशी शिक्षा का करण्यात येउ नये ? याबाबत कारणे दाखवा नोटीस दिली असता सदर नोटीशीस त्यांनी दिलेला खुलासा असमाधान कारक असल्याने त्यांना प्रस्तावीत करण्यात आलेली शिक्षा कायम करणे कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) (अ) अन्वये मा. स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असल्याने प्रकरण निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** श्री. बाबासाहेब अशोक घोरपडे, सफाई कामगार, यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)ग नुसार महानगरपालिका सेवेतुन काढून टाकणे या प्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिति सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३५ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी जरूरी प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे कामी जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- टिपण्णी-विषय-अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१०या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य जरुरी प्रमाणे खरेदीकामी वर्तमानपत्रात, महानगरपालिका वेबसाईट तसेच महानगरपालिका नोटीस बोर्डवर जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत.

**सादर**,

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, सार्व.बांधकाम विभाग, इलेक्ट्रिक विभाग व इतर सर्व विभागांना लागणारे साहित्य,उपकरणे, स्टेशनरी, तसेच सर्व दवाखान्यासाठी लागणारी औषधे, रसायणे व वैद्यकीय साहित्य उपकरणे इत्यादी जरुरीप्रमाणे खरेदी करण्यासाठी वार्षिक निविदा दर मागविण्याकरिता जा. नं.स्टोअर विभाग-१० दि.१६/०४/२००९ व जा.क्रं.स्टोअर विभाग - १६ दि.३०/०४/२००९ अन्वये शहर अभियंता,वैद्यकिय आरोग्य अधिकारी, यंत्र अभियंता, इलेक्ट्रिक विभाग प्रमुख,मुख्य अग्निशमन अधिक्षक, उद्यान अधिक्षक व झोन प्रमुख झोन क्र. १ ते ६ यांना माहिती स्टोअर विभागाकडे देणे बाबत कळविले असता त्यांचेकडून माहिती प्राप्त झालेली आहे.

सन २००९-१० या आर्थिक वर्षातील मालाची अंदाजे खरेदी किंमत विचारात घेऊन महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग मा.शासन निर्णय क्र भांखस २००२ /(२९९७) / उदयोग ६, मंत्रालय मुंबई ४०० ०३२. दि:- २८ मार्च २००३ कॅालम नं. ५ मध्ये को-या निविदा प्रपत्राचे दर नमुद केलेले आहेत.

| अ.नं | मालाचा तपशील | अंदाजे लागणा-या मालाची किंमत | निविदा बयाणा रक्कम | निविदा फ़ॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी लागणा-या एस. के. एफ़. कंपणीच्या बेअरिंग | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| २ | ॲलम (तुरटी) ग्रेड-I (ब्लॉक), ब्लिचिंग (TCL) पावडर ग्रेड-I, लिक्वीड क्लोरिन गॅस ९००किलो सिलेंडर. | १०,००,०००/- | १०,०००/- | १,०००/- |
| ३ | इलेक्ट्रीक साहित्य उदा. ४० वॅट ट्युब ,स्टार्टर, लॉक होल्डर, चोक, ट्युब पट्टी, सोडीयम बल्प (वॅट -७०,१५०, २५०), सोडीयम चोक, १५०/२५० वॅट सोडीयम इग्नेटर,कॉपर केबल, मोटर पंप मेनस्वीच स्टार्टर, फ्युज, यु.पी.एस. टयुबलर बॅटरी इत्यादी. | ३०,००,०००/- | ३०,०००/- | २,०००/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | जंतुनाशक द्रव्य,पावडर उदा. डि.डि.व्ही.पी. ७६% इ. सी., ॲबेट ५०% इ. सी.,बेटेक्स लिक्वीड १००० इ.सी., टेमीगार्ड ५० इ.सी., पायरेथ्रम एक्सट्रक्ट २%, हायड्रोक्लोरिक ॲसिड एन/३०, कार्बोफ़िनॉल पावडर, ब्लॅक फ़िनेल आर. डब्लू. सी. १८,मॉस्क्युटो लार्व्हीसाईडल ऑईल इत्यादी. | ५,००,०००/- | ५,०००/- | १,०००/- |
| ५ | प्रभाग समिती कार्यालय क्र.१ ते २ करिता - प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स फ्रेमसह, सिमेंट मोझॅक बेंचेंस, इ. | ३,००,०००/- | ३,०००/- | ७५०/- |
| ६ | प्रभाग समिती कार्यालय क्र. ३ ते ४ करिता - प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स फ्रेमसह, सिमेंट मोझॅक बेंचेंस, इ. | ३,००,०००/- | ३,०००/- | ७५०/- |
| ७ | एन पी.२ क्लास व एन पी.३ क्लास हयुम पाईप कॉलरसह,सिमेंट आवारु सिमेंट मुतारी,चायना पाईप,सिमेंट व्हेंट पाईप,संडास भांडे पी ट्रॅपसह, युरीनल भांडे इत्यादी. | ३,००,०००/- | ३,०००/- | ७५०/- |
| ८ | प्रभाग समिती कार्यालय क्र.१ ते २ करिता - खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्डमुरुम, सॉप्टमुरुम, तांबड्या विटा, डबर इ. | २५,००,०००/- | २५,०००/- | २,०००/- |
| ९ | प्रभाग समिती कार्यालय क्र.३ ते ४ करिता - खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्डमुरुम, सॉप्टमुरुम, तांबड्या विटा, डबर इ. | २५,००,०००/- | २५,०००/- | २,०००/- |
| १० | लोखंडी पहार, टिकाव, खोरे, दांडे, लोखंडी फावडी, हॅन्ड ग्लोव्हज, गमबुट, सेप्टीश्युज, सेप्टीमास्क, रबरी होजपाईप. बांगडीपाईप, फवारणी पंप, सुतीदोर, प्लास्टिक ताडपत्री, लोखंडीपत्रा, वेल्डींग रॉड, सर्व प्रकारची खिळे, सुतारकामाची हत्यारे, गार्डन कातरी, लॉनमोअर मशीन,बांबुकत्ती,चुना फक्की,सिमेंट् पेन्ट,ऑईल बॉन्ड इ. | ३,००,०००/- | ३,०००/- | ७५०/- |
| ११ | उद्यान विभागाकरिता वृक्ष रोपे, फळझाडे रोपे, शोभेची रोपे, फुलझाडांची रोपे, इत्यादी. | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| १२ | लोखंडी ट्री गार्ड | २,००,०००/- | २,०००/- | ७५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | ISI मार्क MJP प्रमाणीत, स्लुईस व्हाल्व, G.I.पाईप,PVC पाईप,CI पाईप व तदसंबंधी लागणारी फ़िटींग, बोअरीग साहीत्य इत्यादी. | १०,००,०००/- | १०,०००/- | २,०००/- |
| १४ | महानगरपालिका दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे, रसायने, व वैद्यकिय साहीत्य,उपकरणे इत्यादी. | ३५,००,०००/- | ३५,०००/- | २,०००/- |
| १५ | नारळी खराटे ७५० ग्रॅम वजनाचे,. पंखा टाईप गोलाकार झाडू, मोलाचे कुंचे इत्यादी. | २,००,०००/- | २,०००/- | ७५०/- |
| १६ | लोखंडी कचरा ढकलगाडी, तीनचाकी सायकल रिक्षा,फायबर युरिनल,फुटपाथ लिटर बिन,१० सीटचे फिरते शौचालय इत्यादी. | १५,००,०००/- | १५,०००/- | २,०००/- |
| १७ | गावरान ज्वारीचा बागायती पालेदार कडबा, वाढ्यासह ऊस, मका हिरवी गावरान ज्वारीचे कडवळ हिरवे इ. | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| १८ | ऑफ़िस व संगणक स्टेशनरी साहित्य :- पांढरा कागद, क्वायर रजिस्टर, टेन्सिल पेपर, डुप्लीकेट बुक, फ़ाईल्स, गम, बॉटल्स, कार्बन पेपर,स्टॅम्प पॅड,टॅग,टाचनी, सुतळी , कुलूप,कार्टेज टोनर, रिबीन, फ़्लॉपी, कॅल्क्युलेटर, प्लॅस्टीक पिशवी, स्टेनो डायरी, संगणक पेपर इ. | ६,००,०००/- | ६,०००/- | १,०००/- |
| १९ | जेंटस व लेडिज शाल, गावठी कापड, नॅपकिन, टि शर्ट, टोपी, फेटा इत्यादी. | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| २० | सत्कार समारंभाकरीता सन्मान चिन्ह साईज १०", १२", १५" आवश्यकतेनुसार मसुदा,फोटो व आकार इ.सह नमुना पसंती प्रमाणे पुरवठा करावा लागेल.<br>फ्लेक्स बोर्ड- रिबीटसह व फलेक्स बोर्ड - १" लोखंडी फ्रेमसह<br>साईज निविदा प्रपत्र'अ'मध्ये नमुद आहे | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |

उपरोक्तप्रमाणे अ नं. १ ते २० चे स्वतंत्र गट करुन वार्षिक निविदा दर मागवावे लागतील.

सन २००७ -०८ चे वार्षिक निविदा बाबत पारित झालेल्या ठरावाचे कार्यवृत्त कायम करणे विषयी मा.स्थायी समिती सभा क्र. ७ दि. १०/९/२००७ च्या सभेतील स्थायी समिती ठ. क्र. १ दि. १०/९/२००७ ठरावान्वये 'मा.स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००९ रोजी सभेचे कर्यवृत्त कायम करणे विषयी सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, पुढील वर्षाचे वार्षिक खरेदीकामी जाहिर निविदादर मागविताना मान्यताप्राप्त कंपनीचे ऑथराईज डिलर,सब डिलर यांचेच निविदा दर स्वीकारले जातील अशी अट नमुद करुन जाहिर निविदा दर मागविण्यात यावेत मा.स्थायी समिती सभा दि.०३/०८/२००७ रोजीचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे'.असा ठराव पारित झालेला आहे.

सदर ठरावाप्रमाणे जाहिर निविदा दर मागविताना मान्यता प्राप्त उत्पादक कंपनी व त्यांचे ऑथराईज डिलर,सब डिलर यांचेच निविदादर स्वीकारले जातील अशी अट नमुद करुन निविदा मागविण्यास उपरोक्तपैकी अ.नं. १ ते ७ करिता स्पर्धात्मकदृष्टया तुलणा करणेकामी कमीतकमी तीन या प्रमाणे निविदा प्राप्त होवू शकतील मात्र अ.नं.१ ते २० पैकी अ. नं. ८ ते २० करिता अनेक उत्पादित कंपणीचे निविदा दर मागविलेले असल्याने प्रत्येक कंपनी करिता स्पर्धात्मकदृष्या तुलना करणेकामी कमीत कमी तीन याप्रमाणे निविदा प्राप्त होवू शकणार नाही

अ. नं. ५ ते ८ करिता माल लवकरात लवकर प्राप्त होण्याच्या दृष्टीने मा.शहर अभियंता यांनी प्रभाग समिती कार्यालय क्रं.१ ते २,प्रभाग समिती कार्यालय क्र. ३ ते ४ करिता स्वतंत्र गट करुन स्वतंत्र पुरवठादार नेमणे कामी सुचीत केलेले असून त्या प्रमाणे वेगवेगळया यादया पाठविलेल्या आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे अ. नं.१ ते २० चे स्वतंत्र गट करुन त्या पैकी अं, नं. १ ते ७ बाबत जाहिर टेंडर नोटीस मध्ये मान्यता प्राप्त उत्पादक कंपनी व त्यांचे ऑथराईज डिलर ,सब डिलर यांचेच निविदा दर स्विकारले जातील. अशी अट नमुद करुन व उर्वरीत अ. नं.८ ते २० बाबत स्पर्धात्मकदृष्ट्या दराची तुलना करणेकामी जास्तीत जास्त निविदा प्राप्त होण्याकरीता जाहिर टेंडर नोटीसमध्ये,उत्पादक, ऑथराईज डिलर ,सब डिलर, पुरवठादार यांचेकडून निविदा फ़ॉर्म मधील अटी शर्तीनुसार दोन (२) लिफ़ाफ़े पध्दतीने सिलबंद निविदा वर्तमान पत्रात,महानगरपालिका वेब साईट व महानगरपालिका नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन वार्षीक निविदा दर मागविणेस व निविदा प्रसिध्दीकामी येणा-या खर्चास मंजूरी मिळावी हि विंनती.

यावर मा.अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेस्तव.

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की,वार्षिक निविदा प्रसिध्द करणेस हरकत नाही जुलै २००९ मध्ये अंदाजपत्रक मंजूरीनंतर कार्यवाही करणे योग्य.यावर मा.उपायुक्तसाहेब(कर) यांचा अभिप्राय की,'अ' नुसार कार्यवाही करणे योग्य तथापि निविदा प्रसिध्दिच्या मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

अंदाजपत्रकिय तरतूद-सन-२००९-२०१०या आर्थिक वर्षाकरीताच्या अंदाजपत्रकीय तरतूदीस अधिन राहुन वार्षिक निविदा दर मागविणेबाबत कार्यवाही करावी लागेल.

येणे प्रमाणे स्टोअर प्रमुख विभाग ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि.३०/६/०९

**सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी जरूरी प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे कामी जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.पंजाबी ज.नि.:- छपाई साहित्य छापून घेतांना मा. सदस्यांना लेटर पॅड छापून घेउन्न देणेत यावेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. सदस्यांचे मानधनामध्ये स्टेशनरी इत्यादी साहित्याचा समावेश असल्याने मानधन देत आहोत मानधन वाढविणे बाबत मा. शासनाकडेस प्रस्ताव पाठवून मंजूरी घ्यावी लागेल.

मा.श्री.पवार बा.रे.:-सन २००९-२०१०सालासाठी वार्षिक निविदा दर मागविणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य जरूरी प्रमाणे खरेदी करणे कामी जाहिर निविदा मागविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी जरूरी प्रमाणे लागणारे साहित्य खरेदी करणे कामी वर्तमान पत्रातुन महानगरपालिका वेबसाईट तसेच महानगरपालिका नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस मंजूरी देणेत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३६ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधीनी पुणे या संस्थेतर्फे चालविण्यात येणा-या नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास उपायुक्त (कर) यांना पाठविणे व त्याकामी येणारे खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-विषय- नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास बसण्यास व येणारे खर्चास मंजुरी मिळणे बाबत.

मा.डॉ. पंकज जावळे, उपायुक्त (कर) यांनी दिनांक १६/१२/२००८ रोजी अर्ज देवून मा.महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००६/५१३/ प्र.क्र. ९०/२००६ नवि २० दिनांक २० सप्टेंबर २००६ अन्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेतर्फे चालविणा-या नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास बसण्यास परवानगी व येणारे खर्चास मंजुरी मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

सदर अभ्यासक्रमांस मा.श्री. पंकज जावळे, उपायुक्त (कर) यांना प्रशिक्षणास पाठविणेस व अंदाजे रक्कम रू.२,००,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख फक्त) खर्च अपेक्षीत आहे. सदर बाब धोरणात्मक असल्याने मुळ प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभे मध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सदरचे प्रशिक्षण कामी किती खर्च येणार आहे?

आस्थापना प्रमुख श्री. साबळे :- संस्थेचा रूपये एक लाख साठ हजार व एकूण अंदाजे खर्च रक्कम रूपये दोन लाख या प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

मा.श्रीमती ढोणे मा.सु.:- करित असलेले खर्चाचा आपले महानगरपालिकेस लाभ व्हावा.

मा.श्री.भोसले ग.पु. :- चांगले अधिकारी आहेत. त्यांचे प्रशिक्षणाचा आपले महानगरपालिकेस फायदा व्हावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री. भोसले ग.पु. :- मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**प्रस्तावाचा विषय :-** यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधीनी पुणे या संस्थेतर्फे चालविण्यात येणा-या नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास उपायुक्त (कर) यांना पाठविणे व त्याकामी येणारे खर्चास मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**ठराव :-** मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २००६/५१३/प्र.क्र.९०/ २००६ नवि-२०, दिनांक २० सष्टेंबर २००६ अन्वये यशदा,पुणे या संस्थेतर्फे चालविण्यांत येणा-या नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका (P.G.D.U.M.) या अभ्यासक्रमासाठी डॉ.श्री.पंकज वसंतराव जावळे, उपायुक्त (कर) यांची निवड करण्यांत आली आहे. सदरील अभ्यासक्रम पुर्ण करण्यांस व त्याकामी विहीत फी भरणेस तसेच तदनुषंगिक येणारे खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेंच सदर कामी होणारा खर्च सन २००९-१० या सालातील अंदाज पत्रकांत नमुद करण्यांत आलेल्या " महानगरपालिका पदाधिकारी/ कर्मचारी प्रशिक्षण" या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक -मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

सन २००९-२०१०

विषय क्रमांक- ३७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

ठराव क्रमांक - ३७ मंगळवार दिनांक २८/७/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता ड्रेनेज सफाई करणे कामी टाटा ११०२ चेसी व त्यावर पॉवर जेटींग मशीन करून घेणे कामी येणारे खर्चास व कामास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकरिता ड्रेनेज सफाई करणे कामी टाटा ११०२ चेसी व त्यावर पॉवर जेटींग मशीन करून घेणे कामी येणारे खर्चास व कामास मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

टिप्पणी- उपरोक्त विषयान्वये विनंती सादर की, अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभागासाठी शहरातील व महानगरपालिका हद्दीमधील ड्रेनेज लाईन साफ सफाई करणे करिता जेटींग मशीनची आवश्यकता असल्याबाबत आरोग्य विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरच्या प्रस्तावा बाबत मोटार व्हेईकल विभागामार्फत चार वेळेस निविदा मागविण्यांत आल्या असता चौथ्या (४) वेळेस एकूण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदरच्या निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या होत्या.

१) पॅनटॅक इ सर्व्हिसेस, मुंबई
२) विनटेक कंट्रोल्स, औंद, पुणे
३) कायझेन इन्व्हारोटेक, कासारवाडी, पुणे

वरील नमुद केलेल्या निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.७/४/०९ रोजी उघडण्यात आले व सदरच्या निविदा धारकामधील सर्वात कमी दरांची निविदा कायझेन इन्व्हारोटेक, कासारवाडी, पुणे यांना निगोशिएशन साठी दि.२०/२/०९ रोजी मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात बोलविले असता व निगोसिएशन मध्ये कायझेन इन्व्हारोटेक, इंडस्ट्रिज यांचे प्रतिनिधी इमरान कोतवाल यांनी निविदा मध्ये दिलेल्या रक्कमेच्या १०% रक्कम कमी करून पॉवर जेटींग मशीन करून देण्या बाबत लेखी दिलेले आहे.

त्यांचे निविदेतील दराप्रमाणे सदर कामी खर्च रू.१३,५०,०००/- इतका येणार होता, परंतु त्यांनी निगोसिएशनमध्ये १०% कमी दराने काम करून देणेस मान्यता दिलेली असल्याने, सदर कामी खर्च रू.१२,१५,०००/- (रू. बारा लाख पंधरा हजार फक्त) इतका येणार आहे.

त्यामुळे सदरच्या पॉवर जेटींग मशीन बनवून घेणे कामी १) टाटा ११०२ चेसी कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून खरेदी करणे कामी रू. ६.५लाख व २) त्यावर पॉवर जेटींग मशीन बांधणे कामी कमीचे निविदाधारक कायझेन इन्व्हारोटेक, इंडस्ट्रिज, कासारवाडी, पुणे यांचे निगोसिएशन मध्ये झालेल्या चर्चेनुसार रक्कम रू.१२,१५,०००/- (रूपये बारा लाख पंधरा हजार फक्त) असे एकुण रू.१८,६५,०००/- (रूपये अठरा लाख पासष्ट हजार फक्त) खर्च येणार आहे. तरी खर्चास व कामास तसेच संबंधीताकडून नियमानुसार होणारी अनामत रक्कम भरून घेउन करारनामा करून घेउन कामाचे कार्यारंभ आदेश देणेस स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख व मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता ड्रेनेज सफाई करणे कामी टाटा ११०२ चेसी व त्यावर पॉवर जेटींग मशीन करून घेणे कामी येणारे खर्चास व कामास मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- विषय वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे प्रस्तावाचा विषय वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. शेख न.अ.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- मंजुर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता ड्रेनेज सफाई करणे कामी टाटा ११०२ चेसी व त्यावर पॉवर जेटींग मशीन करून घेणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक कायझेन इन्व्हारोटेक, इंडस्ट्रिज, कासारवाडी, पुणे यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच टाटा ११०२ चेसी कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचे कडून खरेदी करणे कामी येणारे रूपये ६,५०,०००/- (रूपये सहा लाख पन्नास हजार फक्त) त्यावर पॉवर जेटींग मशिन बांधणे कामी कमीचे निविदा धारक कायझेन इन्व्हारोटेक, इंडस्ट्रिज, कासारवाडी, पुणे यांचे रूपये १२,१५,०००/-(रूपये बारा लाख पंधरा हजार फक्त) असे एकूण रक्कम रूपये १८,६५,०००/- (रूपये आठरा लाख पासष्ठ हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख नजीर अहमद अ. रज्जाक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडु जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.